मंगळवार, १२ एप्रिल २०२२
राम प्रहर
◆ वर्ष १४ ◆ अंक २६४
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## पंतप्रधान मोदींना लता मंगेशकर पुरस्कार जाहीर



**मुंबई :** दीनानाथ स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने पहिला लता दिनानाथ मंगेशकर पुरस्कार सर्वोत्कृष्ट देशसेवा आणि जनसेवेसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जाहीर झाला आहे. पंतप्रधान मोदी यांच्यासोबतच गायक राहुल देशपांडे, अभिनेत्री आशा पारेख, अभिनेते जॅकी श्रॉफ आणि दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी यांनाही इतर पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येणार आहे. उत्कृष्ट संगीत कारकीर्दीसाठी गायक राहुल देशपांडे, तर सिनेमातील कारकिर्दीसाठी अभिनेत्री आशा पारेख आणि अभिनेते जॅकी श्रॉफ यांना विशेष पुरस्कार देण्यात येणार आहेत. सामाजिक कार्यासाठी आनंदमयी पुरस्कार नूतन मुंबई टिफीन चॅरिटेबल ट्रस्ट म्हणजे मुंबईच्या डब्बेवाल्यांना जाहीर झाला असून संध्याछाया या नाटकासाठी दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी आणि निर्माते श्रीपाद पद्माकर यांनाही पुरस्कार जाहीर झाले आहेत.

### अंतरंग

सुरेश लाड यांचे पुन्हा राजीनामानाट्य/२
कर्जत तालुक्यात पाणीटंचाईचे चटके/७
कबड्डी स्पर्धेत श्रीगणेश दिवलांग संघ विजेता/८

# संपकरी महसूल कर्मचारी आक्रमक

### रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात घुसले

### राज्य शासनाविरुद्ध जोरदार घोषणाबाजी



**अलिबाग : प्रतिनिधी**

महसूल कर्मचार्‍यांचा संप आठव्या दिवशीही सुरूच आहे. रायगडातील महसूल कर्मचार्‍यांनी सोमवारी (दि. ११) आक्रमक होत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात घुसून राज्य शासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

महसूल कर्मचारी विविध प्रलंबित मागण्यांसाठी संपावर गेले आहेत. आठ दिवसांनंतरही हे कर्मचारी आपल्या मागण्यांवर ठाम आहेत. सोमवारी अलिबाग येथील हिराकोट तलाव परिसरात संपकरी कर्मचारी सुरुवातीला जमले. त्या ठिकाणी त्यांची छोटेखानी सभा झाली. त्यानंतर त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात जाऊन राज्य शासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.


अव्वल कारकून व मंडल अधिकारी हा जिल्हास्तरीय संवर्ग असल्याने त्यांच्या याद्या राज्यस्तरावर एकत्रित करण्याची प्रक्रिया रद्द करावी, अव्वल कारकून किंवा मंडल अधिकारी यांची पदोन्नतीने नायब तहसीलदार संवर्गात पदोन्नती झाल्यानंतर त्यांना त्या त्या विभागातच पदस्थापना देण्यात यावी, संघटनेच्या पदाधिकार्‍यांना बदली प्रक्रियेत संरक्षण मिळावे आदी मागण्यांसाठी महसूल कर्मचारी संपावर गेले आहेत

दरम्यान, आंदोलनाच्या वेळी महसूल कर्मचारी पत्रकारांवर घसरले. आमच्या बातम्या उद्या पेपर आणि टीव्हीवर दिसल्या पाहिजे; अन्यथा लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेला पत्रकार झोपलेला आहे किंवा त्यांनी झोपेचे सोंग घेतले आहे म्हणावे लागेल, असे एका पदाधिकार्‍याने म्हटले. या वक्तव्याचा पत्रकारांनी निषेध केला. त्यानंतर या कर्मचार्‍याने झाल्या प्रकाराबद्दल माफी मागितली तसेच महसूल कर्मचारी संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष केतन भगत यांनीही घडल्या प्रकाराबद्दल दिलगिरी व्यक्त केली आहे.

## काँग्रेस-शिवसेनेत व्हाया राष्ट्रवादी वाक्‌युद्ध

### मुख्यमंत्रीपदावरून टोलेबाजी

**मुंबई : प्रतिनिधी**




राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असते, तर चित्र वेगळे असते, असे विधान काँग्रेस नेत्या आणि राज्याच्या महिला व बालकल्याणमंत्री यशोमती ठाकूर यांनी जाहीर भाषणात केले आहे. विशेष म्हणजे खासदार पवार मंचावर बसलेले असतानाच मंत्री ठाकूर यांनी हे वक्तव्य केल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. दुसरीकडे महाविकास आघाडी सरकारमध्ये मुख्यमंत्रीपद असणार्‍या शिवसेनेने या वक्तव्यावर प्रतिक्रिया देत काँग्रेसला चिमटा काढला. त्यामुळे शिवसेना विरुद्ध काँग्रेस यांच्यातील धुसफूस थेट मुख्यमंत्रीपदापर्यंत पोहचली असल्याचे स्पष्ट झाले आहे.

खासदार शरद पवार रविवारी अमरावती दौर्‍यावर होते. अमरावती येथील डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात शरद पवार यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण व सभागृहाचे लोकार्पण सोहळ्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला खासदार शरद पवारांबरोबरच महिला व बालकल्याणमंत्री यशोमती ठाकूरांसहीत इतर नेतेही उपस्थित होते. या कार्यक्रमात मंत्री ठाकूर यांनी बोलताना मुख्यमंत्रीपदाबाबद मोठे वक्तव्य केले.

शरद पवारांसाठी काय आणि किती बोलावे. छोट्या तोंडी मोठा घास घेतेय, पण तुम्ही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असता, तर महाराष्ट्राचे चित्र अजून वेगळे असे, असे यशोमती ठाकूर या वेळी म्हणाल्या. (पान २ वर..)

### खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ

# विद्यार्थ्यांनो, सर्वस्व झोकून देऊन कष्ट करा -डॉ. विजय जोशी



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मानसिकता बदला, स्वतःवर विश्वास ठेवा आणि त्या विश्वासाने आपण जे काम करतोय त्यात सर्वस्व झोकून देऊन कष्ट करा, असा मोलाचा सल्ला मुंबई विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता तसेच रूसा अभियानाचे मुख्य सल्लागार डॉ. विजय जोशी यांनी विद्यार्थ्यांना दिला. ते जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालयात सोमवारी (दि. ११) आयोजित करण्यात आलेल्या पदवी वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ झाला.

या समारंभाला पनवेलचे आमदार तथा जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यकारी मंडळ सदस्य प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय मराठे, चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयाचे प्राचार्य एस. के. पाटील यांच्यासह पदाधिकारी, प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेऊन उज्ज्वल यश संपादित केले आहे अशा विद्यार्थ्यांना या समारंभात मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. (पान २ वर..)

### लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून शुभेच्छा

समारंभाचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पदवी मिळालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि आयुष्यात अशीच प्रगती करीत राहा, अशा शुभेच्छा दिल्या, तर आमदार प्रशांत ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नोकरी करण्यापेक्षा नोकरी देणारे बना, असा महत्त्वाचा सल्ला देऊन त्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### निवडक

**झारखंडमध्ये रोप वेचा अपघात; दोघे ठार, इतर प्रवासी अडकले**

**रांची :** झारखंडच्या देवघर जिल्ह्यातील बाबा बैद्यनाथ मंदिराजवळील त्रिकुट टेकडीवर रोप वेवरचे दोन डबे एकमेकांवर आदळल्याने दोन जण ठार आणि अनेक जखमी झाले आहेत. तांत्रिक बिघाडामुळे ही घटना घडल्याचे दिसते, असे एका अधिकार्‍याने सांगितले, मात्र नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. भारतीय हवाई दलाच्या दोन हेलिकॉप्टरच्या मदतीने बचावकार्य सुरू आहे.

**पाकिस्तानच्या पंतप्रधानपदी शाहबाज शरीफ यांची निवड**

**इस्लामाबाद :** पाकिस्तानच्या पंतप्रधानपदी पाकिस्तान मुस्लिम लीग-नवाझचे (पीएमएल-एन) अध्यक्ष शाहबाज शरीफ यांची बिनविरोध निवड झाली आहे. इम्रान खान यांच्या पक्षाने निवडणुकीवर बहिष्कार टाकला. शाहबाज शरीफ हे पाकिस्तानचे २३वे पंतप्रधान झाले आहेत. ते माजी पंतप्रधान राहिलेले नवाझ शरीफ यांचे धाकटे भाऊ आहेत.

## शरद पवार यांच्या घरावर झालेल्या हल्ल्यास ठाकरे सरकार जबाबदार

### ■ ना. रामदास आठवले यांचा आरोप

**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या निवासस्थानी एसटीच्या कामगारांनी आंदोलन केल्याची घटना घडली होती. या पार्श्वभूमीवर आता केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. शरद पवार यांच्या घरावरील हल्ला निंदनीय असून या हल्ल्यास ठाकरे सरकार जबाबदार असल्याचे ते म्हणाले. पुण्यात एका कार्यक्रमासाठी आले असताना ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.



या वेळी ना. रामदास आठवले म्हणाले की, राज्य सरकारने एसटी कामगारांच्या भावनेचा विचार करायला हवा. त्यांच्या मागण्या मान्य कराव्यात. मागील कित्येक महिन्यांपासून आंदोलन सुरू आहे. या आंदोलनामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली आहे, मात्र एसटी कामगारांच्या भावनांचा विचार न केल्याने त्यांचा उद्रेक झाला असून त्यातून हा हल्ला झाला आहे, पण अशा प्रकारचा हल्ला करणे योग्य नसून ही घटना निंदनीय आहे. शरद पवार यांच्या घरी हल्ल्याबाबत पोलिसांना माहिती नव्हती का, असा सवाल उपस्थित करीत ठाकरे सरकारच या हल्ल्यास जबाबदार असल्याचा आरोप त्यांनी केला तसेच हल्लेखोर एसटी कामगारांना कामावर घेणार नाही, अशी भूमिका परिवहनमंत्री अनिल परब यांनी मांडली आहे. हल्ल्यात सहभागी असलेल्यांना कामगारांना कामावर न घेण्याची भूमिकादेखील चुकीची आहे, असेही ते म्हणाले.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हयात असते, तर उद्धव ठाकरे यांना काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर कधीच जाऊ दिले नसते. अडीच-अडीच वर्षांच्या फॉर्म्युल्याचा विचार करून उद्धव ठाकरे यांनी भाजपबरोबर यावे. त्यासाठी अजूनही वेळ गेलेली नाही, असे सांगत उद्धव ठाकरे यांना भाजपसोबत येण्याचे आवाहन ना. आठवले यांनी या वेळी केले.

### सत्र न्यायालयाच्या निर्णयाला सोमय्या देणार उच्च न्यायालयात आव्हान

**मुंबई : प्रतिनिधी**

आयएनएस विक्रांतसंदर्भात भाजप नेते किरीट सोमय्या यांचा अटकपूर्व जामीन अर्ज सोमवारी (दि. ११) मुंबई सत्र न्यायालयाने फेटाळला. कोर्टाच्या या निर्णयानंतर सोमय्या यांच्या वकील पावना चड्ढा यांनी प्रतिक्रिया देताना, आम्ही या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देणार आहोत, असे सांगितले.

न्यायालयाने किरीट सोमय्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्यानंतर त्यांच्या वकील पावनी चड्ढा म्हणाल्या की, किरीट सोमय्या आणि नील सोमय्या यांच्या अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. सुनावणी झाल्यानंतर कोर्टाने किरीट सोमय्यांचा अर्ज फेटाळला. आता आम्ही या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देऊ.

## गुणरत्न सदावर्ते यांच्या पोलीस कोठडीत वाढ

**मुंबई : प्रतिनिधी**



राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या मुंबईतील सिल्व्हर ओक या निवासस्थानी अचानक मोर्चा नेत आक्रमकपणे आंदोलन केल्याप्रकरणी अटकेत असलेले आंदोलनकर्त्यांचे वकील गुणरत्न सदावर्ते यांच्या पोलीस कोठडीत दोन दिवसांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे त्यांचा कोठडीतील मुक्काम १३ एप्रिलपर्यंत वाढला आहे.

एसटी कर्मचार्‍यांना चिथावणी दिल्याच्या आरोपाखील वकील गुणरत्न सदावर्ते यांना न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या घरासमोर अचानकपणे आंदोलन केल्याप्रकरणी ११० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. न्यायालयात सोमवारी (दि. ११) सरकारी वकिलांसह सदावर्ते यांचे वकील तसेच एसटी कर्मचार्‍यांच्या वकिलांनी युक्तीवाद केला.

मुंबई पोलिसांच्या वतीने सरकारी वकील प्रदीप घरत यांनी युक्तीवाद करीत तपास प्राथमिक टप्प्यात असल्याने पोलीस कोठडी आवश्यक असल्याचे सांगितले. न्यायालयाने सरकारी पक्ष आणि बचाव पक्षाचे युक्तीवाद ऐकल्यानंतर सदावर्तेंना आणखी दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# वालासह कडधान्यांचे भाव वधारले



**सुधागड : रामप्रहर वृत्त**

अवकाळी पावसामुळे उत्पादनात घट झाली असल्याने जिल्ह्यात कडधान्याचे भाव वधारले आहेत. मागील वर्षी ९० ते १०० रुपये किलो मिळणारे वाल यंदा १३० रुपये किलोने मिळत आहेत. निडी येथील प्रसिद्ध गावठी वालाचे दरही किलोमागे ३० ते ४० रुपयांनी वाढले आहेत.

रायगड जिल्ह्यात कडधान्यांमध्ये सर्वांत जास्त म्हणजे जवळपास चार हजार ३८१ हेक्टरवर वालाची लागवड केली जाते. त्यानंतर मूग, मटकी, चवळी, तूर आदी कडधान्याची लागवड केली जाते. ग्राहकांकडून गोड व कडवे वाल, लहान चवळी आणि निडीच्या वालांना अधिक पसंती असते. पावसाळ्यासाठी खेड्यापाड्यासह शहरातील अनेक जण या कडधान्याची खरेदी करतात. त्यात गावठी कडधान्यांना अधिक मागणी असते. बाजारात किरकोळ व घाऊक दरात कडधान्य उपलब्ध आहेत. अवकाळी पावसामुळे जिल्ह्यात कडधान्य पिकांचे खूप नुकसान झाले. परिणामी यंदा वालाचे उत्पादन कमी झाल्याने भाव वधारले आहेत.

**सध्या बाजारात ग्राहकांची कडधान्य खरेदीसाठी लगबग सुरू आहे. गावठी कडधान्यांना अधिक मागणी असते. अवकाळी पावसामुळे उत्पादन घटल्याने या वर्षी कडधान्यांचे भाव वाढले आहेत.**
**-भद्रेश शहा, कडधान्य विक्रेते,**

**दरवर्षी पावसाळ्याच्या आधी आम्ही गावठी कडधान्य विकत घेतो. यंदा दर जास्त आहेत. शहरातील नातेवाईकांना आवर्जून भेट म्हणून कडधान्ये पाठवितो.**
**-लता माळी, गृहिणी, पाली**

**कडधान्यांचे किरकोळ बाजारातील भाव**

| कडधान्य | गेल्या वर्षीचा दर | यंदाचा दर (प्रतिकिलो) |
|---|---|---|
| निडी वाल | ११० रुपये | १४० रुपये |
| बारीक वाल | ९० ते १०० रुपये | १३० रुपये |
| तुरडाळ, मुगडाळ व मसूरडाळ | १०० रुपये | १०५ रुपये |
| पावटा | १०० रुपये | ११५ रुपये |
| उडीद, मटकी व मूग | ११० रुपये | ११५ रुपये |
| काळा व हिरवा वाटाणा | ९० रुपये | १०० रुपये |
| अख्खे तूर | ६० रुपये | ७० रुपये |

### कृतज्ञ मी कृतार्थ मी नाट्यप्रयोग सादर

## पनवेलकरांनी अनुभवले स्वातंत्र्यवीर सावरकरांचे आगळेवेगळे व्यक्तिमत्त्व

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



संस्कार भारती कोकण प्रांत आणि भाजप सांस्कृतिक सेल उत्तर रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मधुबिंब प्रोडक्शन प्रस्तुत कृतज्ञ मी कृतार्थ मी या दोन अंकी नाटकाचा प्रयोग रविवारी (दि. १०) पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात रंगला. ज्येष्ठ कलाकार-दिग्दर्शक यतीन ठाकूर व अभिनेत्री दीप्ती भागवत यांच्या दर्जेदार अभिनयातून राजकारणाच्या पलीकडले स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर उलगडताना पनवेलच्या नाट्यप्रेमी व सावरकरप्रेमींनी पाहिले. सावरकरांचा एकूणच अराजकीय प्रवास या संपूर्ण नाट्याविष्कारातून पनवेलकर रसिकांनी अनुभवला.

फडके नाट्यगृहात झालेल्या या प्रयोगाच्या आधी दीपप्रज्ज्वलन झाले व गौरव गीत सादर करण्यात आले तसेच उपस्थित मान्यवरांच्या स्वागताने सुरुवात करण्यात आली. संस्कार भारती व भाजप सांस्कृतिक सेल या दोन्ही संस्था सांस्कृतिक व कला क्षेत्रातील विविध कार्यक्रम घेऊन समाजामध्ये सांस्कृतिक जडणघडणीचे काम सातत्याने करीत असतात. त्याचाच एक भाग म्हणून स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त हा नाट्यप्रयोग रंगला होता. (पान २ वर..)

# सुरेश लाड यांचे पुन्हा राजीनामानाट्य

## मंत्री जयंत पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या संवाद दौर्‍याकडे पाठ



**कर्जत : बातमीदार**

राष्ट्रवादी कॉंग्रेसतर्फे संवाद दौरा करण्यात येत असून सोमवारी (दि. ११) या दौर्‍यातंर्गत कार्यकर्त्यांचा मेळावा कर्जत येथील किरवली येथे झाला. या वेळी राष्ट्रवादीचे प्रदेश अध्यक्ष व राज्याचे जलसंपदामंत्री जयंत पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती, मात्र राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुरेश लाड या मेळाव्याला अनुपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान सुरेश लाड यांच्यामार्फत राजीनामा दिल्याचे पत्र मंत्री जयंत पाटील यांना देण्यात आले. त्यामुळे लाड यांचे पुन्हा एकदा राजीनामानाट्य सुरू असल्याची चर्चा आहे.

याआधीही २०२१मध्ये प्रकृती अस्वास्थ्याचे कारण देत सुरेश लाड यांनी पदत्याग केला होता. त्या वेळी खासदार सुनील तटकरेंसह हायकमांडनेदेखील त्यांची समजूत काढून परत आणले होते, मात्र आता पुन्हा त्यांनी राजीनामा दिल्याने चर्चांना उधाण आले आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसतर्फे संवाद दौर्‍यादरम्यान कर्जत येथे राष्ट्रवादीच्या प्रदेशाध्यक्षांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हाध्यक्ष या नात्याने सुरेश लाड यांनी उपस्थित राहणे गरजेचे होते, मात्र मात्र सभा सुरू होताच काही वेळाने लाड यांच्या वतीने त्यांचा राजीनामा स्वीय सहाय्यकामार्फत प्रदेशाध्यक्ष पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. या प्रकारामुळे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्येही संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून पक्षश्रेष्ठी आता काय भूमिका घेणार, याकडे सर्वांचेच लक्ष लागून राहिले आहे.

### जिल्हाध्यक्ष नॉट रिचेबल

राष्ट्रवादीच्या परिवार संवादमध्ये पक्षाचे जिल्हा अध्यक्ष सुरेश लाड उपस्थित नव्हते, मात्र सभा सुरू होताच काही वेळाने लाड यांच्या वतीने त्यांचा पदाचा राजीनामा त्यांच्या स्वीय सहायकामार्फत पक्षाचे प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. त्या वेळी लाड यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांचे दोन्ही मोबाइल क्रमांक नॉट रिचेबल दिसून आले, मात्र उरण येथील परिवार संवादमध्ये काही वाद झाल्याचे बोलले जात असून तेथून लाड बाहेर पडल्याचे समजते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना चित्रांतून आदरांजली

## नवी मुंबई मनपाचा उपक्रम; ३५०हून अधिक चित्रकारांचा सहभाग

**नवी मुंबई : बातमीदार**

जागर २०२२ या अभिनव उपक्रमांतर्गत नामवंत साहित्यिक, विचारवंत यांच्या विविध विषयांवरील व्याख्यानांचे आयोजन करून अनोख्या पद्धतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती महोत्सव साजरा करण्यात येत आहे.

या अनुषंगाने बाबासाहेबांच्या प्रेरक विचारांवरील अथवा त्यांच्या जीवनचरित्रातील विशेष प्रसंगावरील चित्रे काढून त्यांना आगळीवेगळी आदरांजली अर्पण करण्याच्या दृष्टीने चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. बाबासाहेबांना गुरूस्थानी असलेल्या महात्मा ज्योतिबा फुले जयंतीदिनानिमित्त आयोजित या चित्रकला स्पर्धेत ३५० हून अधिक विविध वयोगटातील चित्रकारांनी सहभाग घेत ही स्पर्धा यशस्वी केली. स्वामी विवेकानंद उद्यान, सेक्टर १४, ऐरोली येथे या स्पर्धेमध्ये सहभागी होण्याकरिता सकाळी ७ वाजल्यापासूनच नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील विद्यार्थी, पालक, शिक्षक, चित्रकार उत्साहाने उपस्थित होते. प्रशासन व समाज विकास विभागाचे उपआयुक्त दादासाहेब चाबुकस्वार यांनी स्पर्धास्थळी उपस्थित राहून चित्रकारांना शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेकरीता इयत्ता ८ वी ते १२ वी च्या गटात ३१७, खुल्या गटात ३४ चित्रकारांनी बाबासाहेबांना चित्रांकीत केले. स्वामी विवेकानंद उद्यानातील शांत, प्रसन्न व मोकळ्या वातावरणात सकाळच्या वेळी चित्र काढताना खूप आनंद मिळाला अशी प्रतिक्रिया अनेक चित्रकारांनी व्यक्त केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर चित्र काढायला मिळणे हे आमच्या दृष्टीने भाग्याचे आहे अशीही प्रतिक्रिया काही चित्रकारांनी दिली.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृहात बुधवारी (दि. १३) सायं. ७ वा. होणार आहे. या वेळी वाचनाचे महत्त्व या विषयावर अनुभव कथन करणार आहेत. सहभागी विद्यार्थी व चित्रकारांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# अनुसूचित जमातीच्या निवृत्त घटकांसाठी दिल्लीवारी

## आमदार रमेश पाटील यांनी घेतली चेअरमनची भेट

**नवी मुंबई : वार्ताहर**



राज्यातील विशेषतः एमएमआरडीए क्षेत्रात एअर इंडिया व बीएसएनएल या विभागातून अनुसूचित जमाती प्रवर्गातील सेवानिवृत्त झालेल्या, पण सेवानिवृत्तीनंतर कोणतेही लाभ काहीना मिळाले नाहीत अशा कर्मचार्‍यांच्या समस्यांबाबत कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष आमदार रमेश पाटील यांनी शिष्टमंडळासोबत संसदीय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती कल्याण समितीचे चेअरमन खासदार किरीट सोलंकी यांची दिल्लीत भेट घेतली.

केंद्र शासन व अंगीकृत प्रशासनात मागील ४० वर्षांपासून सेवानिवृत्त झालेल्या अनुसूचित जमातीतील कर्मचार्‍यांच्या सेवानिवृत्ती वेतनाचा प्रश्न प्रलंबित आहे. त्यामुळे हा कर्मचारी वर्ग मोठ्या आर्थिक संकटात आहे. जे कर्मचारी केंद्र शासनाच्या विविध विभागांमध्ये अनुसूचित जमातीच्या दाखल्यावर सन १९९५ च्या पहिले भरती झालेले आहेत. त्यांचे जात प्रमाणपत्र तपासणीची गरज नसल्याचे स्पष्ट निर्देश मागील वर्षात संसदीय समितीने तामिळनाडू राज्यात लागू केले आहेत, हा आदेश असतानाही त्यांच्या सेवानिवृत्ती संबंधी वेतनाचा प्रश्न आजही रखडला आहे.

डीओपीटीच्या नियमाप्रमाणे कामावर लागल्यापासून तीन वर्षापर्यंत त्यांची चौकशी करण्याची जबाबदारी असल्याने आता त्यांच्यावर टांगती तलवार ठेवणे योग्य होणार नाही. त्यामुळे तामिळनाडू, केरळ व इतर राज्यांना संसदीय समितीने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे महाराष्ट्र राज्यासाठीही तशा मार्गदर्शक सूचना लागू करून महाराष्ट्र राज्यातील एअर इंडिया व बीएसएनएल विभागातून सेवानिवृत्त झालेल्या अनुसूचित जमातीतील बांधवांना न्याय द्यावा अशी मागणी या वेळी आमदार पाटील व शिष्टमंडळाने केली.


# महात्मा फुले विद्यार्थ्यांचे प्रेरणास्त्रोत -रामचंद्र घरत

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतामध्ये स्त्री शिक्षणाचा पाया समाजसुधारक महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी रचला. आज आपल्या महिला जगभर उंचच भरारी घेत आहेत. शिक्षण घेणार्‍या ध्येयवादी मुलींनी थोर समाजसुधारक फुले दांपत्याचे परिश्रम आणि त्याग ध्यानी ठेवावे. त्यांना प्रेरणास्त्रोत मानावे, असा सल्ला भाजप नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष डॉ. रामचंद्र घरत यांनी विद्यार्थ्यांना नेरुळमध्ये बोलताना दिला.

नेरुळमधील शिरवणे हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये महात्मा जोतिबा फुले यांची जयंती भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. रामचंद्र घरत यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना ते मार्गदर्शन करताना बोलत होते. या वेळी भाजप नवी मुंबई महामंत्री डॉ. राजेश पाटील, महामंत्री विजय घाटे, शिरवणे हायस्कूलच्या मुख्याध्यापिका भाग्यश्री चौधरी, प्रदेश आयटी सेल संयोजक सतीश निकम, महामंत्री विजय घाटे, भाजप युवती अध्यक्ष सुहासिनी नायडू, उत्तर भारतीय सेल अध्यक्ष राजेश राय, सुरेश अहिवळे, संकेत धोके, जयवंत तांडेल, राजेश पाटील, प्रदिप पाटील यांसह विद्यार्थी, भाजप पदाधिकारी उपस्थित होते.




पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
मंगळवार, दि. १२ एप्रिल २०२२ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ■ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर

कोव्हॅक्सिन

- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+)
- ८. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१५+)
- ९. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१५+)
- १०. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल (१५+)
- ११. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर (१५+)

कार्बेव्हॅक्स

- १२. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१२ ते १४)

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**


# पनवेल मनपा मुख्यालयात महात्मा फुले जयंती साजरी

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेतील मुख्यालयात सत्यशोधक समाजाचे संस्थापक आणि थोर समाजसुधारक महात्मा फुले यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

या वेळी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त विठ्ठल डाके, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



पान १ वरून

## कॉंग्रेस-शिवसेनेमध्ये व्हाया राष्ट्रवादी वाक्‌युद्ध

यानंतर काही उपस्थितांनी टाळ्या वाजवल्या. त्यावर पुन्हा बोलताना टाळ्या वाजवायला काहीच हरकत नाही. पवारांसाठी जोरात टाळ्या वाजवा, असे मंत्री ठाकूर म्हणाल्या.

कॉंग्रेस नेत्या व मंत्री यशोमती ठाकूर यांच्या या वक्तव्यावर शिवसेनेची भूमिका मांडताना पक्षाच्या प्रवक्त्या आणि विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोर्‍हे यांनी एक व्हिडीओ प्रतिक्रिया रात्री जारी केली. यामध्ये त्यांनी खोचक पद्धतीने टोला लगावला.

शरद पवार यांच्या कार्यक्षमता आणि नेतृत्वाबद्दल कुठलीच शंका नाहीय. मला तर वाटते त्यांना युपीएचे अध्यक्ष करावे. यशोमतीताई तुम्ही असा प्रस्ताव द्याल का, असा सवालही डॉ. गोर्‍हे यांनी व्हिडीओच्या माध्यमातून दिलेल्या प्रतिक्रियेच्या शेवटी विचारला आहे.

## विद्यार्थ्यांनो, सर्वस्व झोकून देऊन कष्ट करा -डॉ. विजय जोशी

या वेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. विजय जोशी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आयुष्यात शिकत राहिले पाहिजे. आपले कौशल्य वाढविले पाहिजे. स्वतःला ओळखून आपण समाजाचे काही तरी देणे लागतो या भावनेने काम करणे गरजचे आहे. त्याचप्रमाणे एकदा हातातून गेलेली वेळ पुन्हा येत नाही. त्यामुळे वेळेचा वापर योग्य पद्धतीने करा. लोकांसोबत सकारात्मक संबंध ठेवून संवाद कौशल्य वाढवा. हे आयुष्य जगताना महत्त्वाचे आहे, असेही त्यांनी सांगितले.

## कृतज्ञ मी कृतार्थ मी नाट्यप्रयोग सादर पनवेलकरांनी अनुभवले स्वातंत्र्यवीर सावरकरांचे आगळेवेगळे व्यक्तिमत्त्व

या वेळी संस्कार भारतीच्या कोकण प्रांतच्या सुनिता खरे, अमित चव्हाण, सौ. टिळक तसेच भाजप सांस्कृतिक सेल उत्तर रायगडचे अध्यक्ष अभिषेक पटवर्धन, सहसंयोजक गणेश जगताप, शहर संयोजक संजीव कुलकर्णी, सदस्य अमोल खेर, वैभव बुवा, साई निकाळजे आदी उपस्थित होते.




**उरण नगरपरिषद**
**निविदा सूचना**

जा.क्र. उनप/बांवि/११२/२०२१-२०२२
उरण नगरपरिषद,
उरण, दिनांक :- ११-४-२०२२

उरण नगरपरिषद खाली नमूद केलेल्या कामाकरिता नोंदणीकृत अथवा अनुभवी कंत्राटदारांकडून मोहरबंद निविदा मागवित आहे. निविदा खाली नमूद केलेल्या मुदतीत मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांच्या नांवे दाखल करणेच्या आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (रुपये) | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत | | कामाची मुदत | निविदा फॉर्म फी रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २% रोखीने | ७% बिलातून | | |
| १ | उरण नगरपरिषदेचे कोटगांव उरण येथे फ्रेण्ड सर्कल जवळील गल्लीत पेव्हर ब्लॉक बसविणे. | रु. १,२०,१९३/- | रु. १.२०२/- | रु. २,४०४/- | रु. ७,१५४/- | रु. ३० दिवस | रु. ५००/- |
| २ | उरण नगरपरिषदेचे कोटगांव उरण येथे श्री. रमाकांत पाटील ते श्री. राम भोईर ते श्री. जयवंत भेबले यांचे घरापर्यंतचे गल्लीत रस्त्याला पेव्हर ब्लॉक बसविणे. | रु. १,०८,६२६/- | रु. १,०८६/- | रु. २,१७३/- | रु. ७,६०४/- | रु. ३० दिवस | रु. ५००/- |
| ३ | उरण नगरपरिषदेचे कोटगांव उरण येथे श्री. प्रविण भोईर ते श्री. मनोहर भोईर ते श्री. रत्नाकर भोईर यांचे घरापर्यंतचे गल्लीत रस्त्याला पेव्हर ब्लॉक बसविणे. | रु. १,०३,४९५/- | रु १,०३५/- | रु. २,०७०/- | रु. ७,२४५/- | रु. ३० दिवस | रु. ५००/- |
| ४ | उरण नगरपरिषदेचे कोटगांव उरण येथे श्री. नितीन पाटील ते श्री. चंद्रकांत पाटील ते श्री. कमळाकर पाटील ते विजय पाटील यांचे घरापर्यंतचे गल्लीत रस्त्याला पेव्हर ब्लॉक बसविणे. | रु. १,४००९१/- | रु १,४०१/- | रु. २,८०२/- | रु. ९,८०६/- | रु. ३० दिवस | रु. ५००/- |
| ५ | उरण नगरपरिषदेचे हद्दीतील राजपाल नाका ते उरण पोलीस स्टेशन पर्यंत रस्त्याला पी.सी.सी करणे. | रु. १,७०,२७५/- | रु १,७१९/- | रु. ३,४३७/- | रु. १२,०३१/- | रु. ३० दिवस | रु. ५००/- |
| ६ | उरण नगरपरिषदेचे हद्दीतील राम मंदिर ते आकाश मेडीकलपर्यंत रस्त्याला पी.सी.सी करणे. | रु. १,७२,७४५/- | रु १,७४९/- | रु. ३,४९७/- | रु. १२,२४१/- | रु. ३० दिवस | रु. ५००/- |
| ७ | उरण नगरपरिषदेचे कोटगांव-उरण येथे माणिक हिराजी पाटील यांचे घरापासून ते श्री. गजानन भोईर ते श्री. हरिश्चंद्र भोईर यांचे घरापर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | रु. १,८३,१४३/- | रु १,३८१/- | रु. २,७६१/- | रु. ९,६६४/- | रु. ३० दिवस | रु. ५००/- |
| ८ | उरण नगरपरिषदेचे कोटगांव-उरण येथे श्री. दयानंद भोईर यांचे घरापासून ते श्री. एकनाथ ठाकूर यांचे घरापर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | रु. १,८३,१४३/- | रु १,३८१/- | रु. २,७६१/- | रु. ९,६६४/- | रु. ३० दिवस | रु. ५००/- |
| ९ | उरण नगरपरिषदेचे कोटगांव-उरण येथे श्री. जरीमरी आई मंदिर ते श्री. समीर सोंडे यांचे घरापर्यंत गल्लीत रस्त्याला पी.सी.सी. करणे. | रु. १,६३,४९२/- | रु १,६३५/- | रु. ३,२७०/- | रु. ११,४४४/- | रु. ३० दिवस | रु. ५००/- |
| १० | उरण नगरपरिषदेचे मौली-उरण येथे श्री. गजानन भोईर यांचे घरापासून ते श्री. दयानंद भोईर यांचे घरापर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | रु. २,००,०००/- | रु २,०००/- | रु. ४,०००/- | रु. १४,०००/- | रु. ३० दिवस | रु. ५००/- |
| ११ | उरण नगरपरिषदेचे देऊळवाडी-उरण येथे पिठाची गिरणी ते मुख्य रस्त्यापर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | रु. २,००,०००/- | रु २,०००/- | रु. ४,०००/- | रु. १४,०००/- | रु. ३० दिवस | रु. ५००/- |
| १२ | उरण नगरपरिषदेचे कामठा रोड नागांव रोडपर्यंतचे नवीन रस्त्याला लाईट पोल बसविणे कामी पोल फाऊंडेशन बांधकाम करणे. | रु. १,१४,६९८/- | रु १,१४७/- | रु. २,२९४/- | रु. ८,०२९/- | रु. ३० दिवस | रु. ५००/- |
| १३ | उरण नगरपरिषदेचे उरण मेला कॉलनी येथे श्री. रवि सोलंकी यांचे रुमची दुरस्ती करणे. | रु. १,६१,६३६/- | रु १,६१६/- | रु. ३,२३३/- | रु. ११,३१५/- | रु. ३० दिवस | रु. ५००/- |
| १४ | उरण नगरपरिषदेचे मोरा फड नं. ५ येथील शंकर मंदिराच्या समोरील मैदानात पेव्हर ब्लॉक बसविणे. | रु. ७५,४७५/- | रु ७५९/- | रु. १,५१०/- | रु. ५,२८०/- | रु. ३० दिवस | रु. १००/- |

**अटी/शर्ती :**

**(१) इसारा रक्कम :-** कामाची इसारा रक्कम धनाकर्ष/रोखीने नगरपरिषदेच्या लेखा विभागात दिनांक १२/०४/२०२२ ते २२/०४/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत भरणेची आहे. जे ठेकेदार इसारा रक्कम भरणा करणार नाहीत अशा ठेकेदारांच्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**(२) कोरे निविदा नमुने विक्री :-** कोर्‍या निविदांचे नमुने नगरपरिषदेच्या लेखा विभागात निविदा शुल्क (न परतीचे) रोखीने भरणा केल्यास दिनांक १२/०४/२०२२ ते २२/०४/२०२२ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत नगरपरिषदेच्या बांधकाम विभागातून उपलब्ध होतील. निविदा नमुने कोणत्याही परिस्थितीत पोस्टाने पाठविले जाणार नाहीत.

**(३) निविदा सादर करणे :-** निविदा सादर करताना द्विलखोटा पद्धतीने दोन स्वतंत्र लखोट्यात पुढीलप्रमाणे सादर करणेच्या आहेत.

I) **लखोटा क्र. १ :-** (तांत्रिक बोली) सदर लखोट्यावर स्पष्टपणे दिसेल असे ''लखोटा क्र. १'' नमूद करणेचे असून सदर लखोट्यात इसारा रक्कम धनाकर्षाद्वारे/रोखीने भरल्याची मूळ पावती व इतर कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

II) **लखोटा क्र. २ :-** (वित्तीय बोली) सदर लखोट्यावर ''लखोटा क्र. २'' असे स्पष्टपणे नमूद करणेचे असून त्यामध्ये नगरपरिषदेने पुरविलेली अधिकृत नमुन्यातील पूर्णपणे भरलेली कोणत्याही अटी/शर्ती व खाडाखोड नसलेली निविदा सादर करणेची आहे.

(४) लखोटा क्र. १ व २ सिलबंद करून तिसर्‍या लखोट्यात एकत्रितपणे भरून त्यावर कामाचे नांव, कंत्राटदाराचे नांव व पत्ता इत्यादी नमूद करून मुख्याधिकारी उरण नगरपरिषद यांचे नांवे दिनांक २५/०४/२०२२ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत नगरपरिषदेच्या आवक/जावक विभागात सिलबंद निविदा सादर करणेच्या आहेत. विहित मुदतीनंतर आलेल्या निविदा कोणत्याही परिस्थितीत स्विकारल्या जाणार नाहीत.

(५) प्राप्त झालेल्या निविदांपैकी लखोटा क्र. १ (तांत्रिक बोलीचा लिफाफा) दिनांक २५/०४/२०२२ रोजी दुपारी २.०० वाजता उपस्थित ठेकेदार किंवा त्यांचे प्रतिनिधींसमोर निविदा समिती सदस्य यांचेकडून बांधकाम विभागात उघडण्यात येईल. तांत्रिक बोली लिफाफ्यातील कागदपत्रांच्या छाननीनंतर पात्र ठरणार्‍या ठेकेदारांच्या वित्तीय बोलीचा लिफाफा (लखोटा क्र. २) दोन दिवसांनंतर निविदा समितीने निश्चित केलेल्या वेळेवर निश्चित केलेल्या ठिकाणी उपस्थित ठेकेदार किंवा त्यांचे प्रतिनिधींसमोर उघडण्यात येईल.

(६) कोणतीही एक अथवा सर्वच्या सर्व निविदा नाकारणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

(७) ठेकेदाराने नगरपरिषदेमध्ये इसारा रक्कम भरणा केल्यानंतर कोणत्याही कामाची निविदा नगरपरिषदेकडे दाखल न केल्यास इसारा रक्कम परत मिळणार नाही.

(८) निविदा सूचना प्रसिद्ध झाल्यानंतर अथवा निविदा स्विकृतीनंतर निविदेतील तपशीलात आवश्यकता वाटल्यास फेरफार, कमी/जास्त करणेचा अधिकार नगरपरिषदेस राहील.

सही/-
**मुख्याधिकारी**
उरण नगर परिषद

# पनवेलकरांच्या सेवेसाठी आधुनिक यंत्रणा

## गांधी हॉस्पिटलमध्ये आमदार प्रशांत ठाकूर व आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलसह नवी मुंबईतील पहिली अजूरिऑन फिलिप्स कॅथलॅब, फिलिप्स डिजीटल एमआरआय व तोशीबा कॅनॉन ३२ स्लाईस सीटी स्कॅन मशिन पनवेल येथील गांधी हॉस्पिटलमध्ये दाखल झाली आहे. त्याचे उद्घाटन सोमवारी (दि. ११) पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर व महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी फीत कापून केले.



या लोकार्पण सोहळ्याला पनवेलच्या महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, राजू सोनी, नगरसेविका दर्शना भोईर, वर्षा प्रशांत ठाकूर, संजय जैन, गांधी हॉस्पिटलचे डॉ. प्रमोद गांधी, यांसह अनेक डॉक्टर्स, नागरिक उपस्थित होते.

या ठिकाणी विविध प्रकारच्या अत्याधुनिक यंत्रणा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने अजूरिऑन कॅथलॅबची वैशिष्ट्य म्हणजे हार्ट अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी, स्टेंट बूस्ट लाईव्ह, कार्डियाक स्विंग, डायनामिक करोनरी रोड मॅप, ब्रेन डीएसए स्टेन्टिग, कॉइलिंग पेरिफेरल अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टी मोस्ट अॅडव्हान्सड कॅथलॅब इन नवी मुंबई लोएस्ट रेडिएशन एक्सपोजर असणार आहे. तर डिजीटल फिलिप्स एमआरआयची वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण बॉडी एमआरआय, न्यूरो इमेजिंग, पेट्स एमआरआय, मेटल आर्टिफॅक्ट रिडक्शन एमआरआय, एमआरआय ब्रेस्ट मॅमोग्राफी, कार्डियाक एमआरआय, मुस्क्युलोस्केलेटल एमआरआय, औंको एमआरआय, रिनल इनसफिशियन्सी पेशंट फ्रेंडली एमआरआय, कमीत कमी एकॉस्टिक साउंड, डिजीटल क्लरिटी, फास्ट एमआरआय आहे. तसेच तोशीबा कॅनॉन सीटी स्कॅनची वैशिष्ट्ये ही ३२ स्लाईस, मेटल आटिफॅक्ट रिडक्शन सिक्विन्स, सीटी गायडेड बायोप्सी, लंग व्हॉल्यूम अॅनालिसिस, आयोडिन मॅपिंग, व्हर्च्युअल एन्डोस्कोपी अशी असणार असून आता गांधी हॉस्पिटलची हार्ट केअरसोबत नवी ओळख निर्माण झाली आहे.

यासाठी कॅथलॅब टीम म्हणून डॉ. अविनाश गुठे, डॉ. ऋषीकेश ठाकूर, डॉ. सागर तांडेल, डॉ. केशव काळे, डॉ. अनुज साठे, डॉ. मुग्धा ठाकूर तर ब्रेन डीएसए टीम म्हणून डॉ. नीरज पटनी, डॉ. किशोर जाधव, डॉ. जयेंद्र यादव, डॉ. समीर काळे तसेच एमआरआय व सीटी स्कॅन टीम म्हणून डॉ. प्रतीक पाटील, डॉ. सुशील पाटील, डॉ. अक्षय गुरसाळे हे काम पाहणार आहेत.

# अॅड. मनोज भुजबळ यांचे सामाजिक कार्य आदर्शवत -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : प्रतिनिधी**

एक एक दिवसाने आपण वाढतोय. या वाढणाऱ्या प्रत्येक दिवसागणिक आपल्याला काही आणखी तरी अनुभवावे ही जी भावना आहे, ती फार कमी जणांमध्ये असते. त्याच पद्धतीने जगलेल्या प्रत्येक क्षणात परमेश्वराची व समाजाबद्दल कृतज्ञतेची भावना असावी व त्या भावनेपोटी समाजाला देण्याचा प्रयत्न करावा करणारी फार कमी माणसे असतात. अॅड. मनोज भुजबळ हे त्यापैकी एक असून त्यांचे सामाजिक कार्य आदर्शवत असल्याचे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी मनोज भुजबळ यांचे वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात केले.



भाजपच्या ओबीसी मोर्चाचे उपाध्यक्ष व पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष नगरसेवक अॅड. मनोज भुजबळ यांच्या वाढदिवसानिमित्त उत्कर्ष कला व क्रीडामंडळाने रविवारी (दि.१०) विविध कार्यक्रम आयोजित केले होते. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, उपमहापौर सीताताई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, प्रभाग समिती 'ड' सभापती अॅड. वृषाली वाघमारे, माजी नगराध्यक्षा स्मिता वाणी, माजी उपनगराध्यक्ष सुभाष भुजबळ, नगरसेविका राजश्री वावेकर, नगरसेवक संतोष शेट्टी, समीर ठाकूर, विजय म्हात्रे, भाजप महिला मोर्चा शहराध्यक्षा वर्षा नाईक, भाजपनेते रवी नाईक, अॅड. जितेंद्र वाघमारे, विनोद वाघमारे, यतीन पाटील, प्रतिभा भोईर, प्रशांत फुलपगारे, प्रमोद भगत, दीपेश भगत व प्रभाग अध्यक्ष म्हात्रे उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी, महापालिका वेगवेगळ्या सेवा पुरवण्याचा प्रयत्न करीत असताना मनोज भुजबळ यांनी तेवढ्यावरच न थांबता उत्कर्ष कला व क्रीडा मंडळाच्या माध्यमातून सेवा देण्याचा प्रयत्न करीत असल्याने कौतुक केले. महापालिकेकडून सुविधा हव्या असतील, तर कर भरणे आवश्यक असल्याचे सांगून तो कसा कमी आहे याची माहिती दिली. अमृत योजनेची माहिती देऊन त्याचा फायदा दोन अडीच वर्षांनी होऊन आपली पाण्याची गरज पूर्ण होईल. पण तोपर्यंत सिडकोला जागे केल्याशिवाय हालत नाही, म्हणून मटका फोड आंदोलन करणार असल्याचे सांगितले.

या वेळी मनोज भुजबळ यांनी आम्ही चार नगरसेवकांनी निवडणुकीत दिलेली ९० टक्के आश्वासने पूर्ण केल्याचे सांगितले. वडिलधारे लोकनेते रामशेठ आणि आपले दोघांचे सहकार्य असल्यानेच हे शक्य झाल्याचे सांगितले. यानंतर ई-श्रम कार्डचे व गुढीपाडवा शोभायात्रेतील विजेत्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आली.

# संविधान आणि नागरिकांचे कर्तव्य यावर व्याख्यान

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंतीनिमित्त सामाजिक समता कार्यक्रमांतर्गत भारताचे संविधान आणि भारतीय नागरिकांचे कर्तव्य यावर सामाजिक कृतज्ञता निधीचे कार्याध्यक्ष सुभाष वारे यांचे व्याख्यान मंगळवारी (दि. १९) समिती सभागृह, कोकण भवन येथे दुपारी ३.३० वाजता होणार आहे. या कार्यक्रमात प्रमुख वक्ता म्हणून लाभलेले सुभाष वारे यांनी भारतीय संविधानाला अपेक्षित जबाबदार नागरिकत्व घडण्यात प्रेरक ठरणाऱ्या राष्ट्रसेवा दल या संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून चार वर्षे काम पाहिले आहे. भारतीय संविधान आणि त्यातील मुल्ये हा त्यांच्या अभ्यासाचा विषय आहे. एस. एम. जोशी सोशालिस्ट फाउंडेशनच्या वतीने मागील पाच वर्षे संविधान साक्षरता अभियानात व्याख्यानांचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# महात्मा फुलेंचे विचार आचरणात आणावेत -हर्षला पाटील

### गव्हाण विद्यालयात महात्मा फुले यांना अभिवादन



**गव्हाण : वार्ताहर**

एक स्त्री शिकली तर दोन कुटुंबे शिकतात, या प्रेरणेने स्त्री-शिक्षणाच्या अलौकिक कार्याला तसेच बहुजनोद्धारासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या महात्मा ज्योतिबा फुले यांचा नितांत आदर बाळगून त्यांचे विचार आचरणात आणावेत, असे प्रतिपादन विद्यालयाच्या उपशिक्षिका हर्षला पाटील यांनी केले.

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. या वेळी पाटील यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला.

विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य तसेच रयत को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक प्रमोद कोळी, रयत शिक्षण संस्थेच्या लाईफवर्कर ज्योत्स्ना ठाकूर, जुनिअर कॉलेज विभागप्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील सर्व अध्यापक व इतर सेवक उपस्थित होते.

# समाजासाठी कार्य करणारे सर्वांसाठी सन्माननीय

### महापौर कविता चौतमोल यांचे उत्तर भारतीयांच्या कार्यक्रमात गौरवोद्गार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक कार्यकर्ते कोणत्याही पक्षाचे असले तरी त्यांचा सन्मान करणे गरजेचे आहे. समाजासाठी काम करणारे सर्वांसाठी समान असतात. ही मंडळी दरवर्षी सांस्कृतिक कार्यक्रम करतात, यातून समाजात एक चांगला संदेश जातो, असे गौरवोद्गार महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी काढले.



पनवेलमधील उत्तर भारतीय सामाजिक प्रतिष्ठानतर्फे रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रम व हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन रविवारी (दि. १०) करण्यात आले होते. त्या वेळी त्या बोलत होत्या. आंध्र कला समिती हॉल सेक्टर २ येथे हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्या हस्ते भगवान श्रीरामाच्या फोटोला पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. महापौर चौतमोल यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सी. पी. यांनी सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

या वेळी समाजाच्या विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्यांचा महापौरांच्या हस्ते सन्मानपत्र, चषक देऊन गौरव करण्यात आला. त्यात प्रामुख्याने रुपाली शिंदे, संध्या चौहान, प्रदीप ठाकरे, सुशील मोरे, ओमप्रकाश प्रजापती, सुनील सिन्हा आणि श्रीकांत दुबे आदींचा समावेश आहे. कार्यक्रमात महिला व मुलांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. गुरू कदम यांच्या मार्गदर्शनाखाली हळदी- कुंकू, विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. खेळांमध्ये सहभागी झालेल्या महिला, मुलांनाही बक्षीस देण्यात आली. बनारसी साडी सुनंदा पवार, अनु ठाकूर, पिंकी शर्मा, शालिनी ठाकरे आणि सावित्री मौर्य यांनी पटकावली.

कार्यक्रमात सुनील सिन्हा आणि रवी नाईक यांनी आपल्या गायनाने उपस्थितांचे मनोरंजन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रामुख्याने सी. पी. प्रजापती, श्रीकांत दुबे, संगीता कुमारी, पूनम प्रजापती, सत्यनारायण शर्मा, विनोद शर्मा, प्रयाग साह, रवींद्र प्रजापती, जयप्रकाश जैस्वाल, विनोद सिंग व राजनाथ पासवान आदींनी सहकार्य केले.

# सायन-पनवेल महामार्गाचे होणार सुशोभीकरण

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सायन-पनवेल महामार्गातील नवी मुंबई पालिका क्षेत्रात येणाऱ्या १२ किमीच्या मार्गाचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. या मार्गात येणाऱ्या पाच उड्डाण पुलांच्या सुशोभीकरणावर भर दिला जाणार आहे. याशिवाय दुभाजकांवर झाडे लावली जाणार आहेत.

नवी मुंबई महापालिका स्वच्छ भारत अभियानांतर्गत पहिला क्रमांक पटविण्यासाठी अनेक प्रयत्न करीत असून शहारातील रंगरंगोटीबरोबरच या महामार्गाचे सुशोभीकरणाचा समावेश आहे. सध्या आयपीएल सामने सुरू असल्याने डी. वाय. पाटील स्टेडियमच्या समोरील उद्यान सुशोभित करण्यात आले आहे.



पनवेल : महापालिका स्थायी समितीचे माजी सदस्य तथा विद्यमान नगरसेवक अजय बहिरा यांच्या वाढदिवसानिमित्त अजय बहिरा आणि पनवेल कच्छ युवक संघाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन सोमवारी तक्का येथील मराठी शाळेत करण्यात आले होते. या शिबिराला सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत नगरसेवक अजय बहिरा यांना शुभेच्छा दिल्या तसेच रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन दिले. या वेळी नगरसेविका रुचीता लोंढे, माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, अल्पसंख्याक सेलचे अमन अख्तर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.






पनवेल : भाजप कामोठे मंडलच्या वतीने सोमवारी जागर अभियानंतर्गत जनसंपर्क मोहिमेदरम्यान ओबीसी समाजातील विविध समाज घटकांची भेट घेऊन त्यांना मोदी सरकार आणि फडणवीस सरकार यांच्याकडून ओबीसी समाजासाठी केलेल्या कार्याची माहिती देऊन त्यांना पत्रक वाटप करण्यात आले. कामोठे ओबीसी मोर्चा मंडल अध्यक्ष भाऊ भगत यांनी राबवलेल्या या अभियानास नगरसेवक डॉ. अरुण कुमार भगत, विकास घरत, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, ज्येष्ठ कार्यकर्ते सुधाकर पाटील आदी सहभागी झाले होते.













पनवेल : रामनवमीनिमित्त रविवारी तालुक्यात ठिकठिकाणी आयोजित केलेल्या कार्यक्रमांना महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले. त्यांच्यासह खारघर सेक्टर ११ येथे भाजपचे खारघर शहराध्यक्ष ब्रिजेश पटेल, माजी सरपंच गुरुनाथ गायकर, सुदर्शन नाईक, रघुनाथ गायकर, सचिन मुंदड, संतोष गायकर, प्रवीण शिंदे, राजू शिर्के, भालचंद्र सुर्वे, चिर्लेत कामगार नेते जितेंद्र घरत आदी उपस्थित होते.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : १६

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

**१. पुढीलपैकी कोणता कर प्रत्यक्ष कर आहे?**
- ***अ.*** जीएसटी
- ***आ.*** कंपनी कर
- ***इ.*** सीमा शुल्क
- ***ई.*** रस्त्यावरील टोल

**२. मार्च २०२२ ला संपलेल्या आर्थिक वर्षांत देशात इतका विक्रमी कर वसूल झाला आहे.**
- ***अ.*** २७ लाख कोटी रुपये
- ***आ.*** १४ कोटी लाख रुपये
- ***इ.*** १२ लाख कोटी रुपये
- ***ई.*** ३० लाख कोटी रुपये

**३. भारतात ७ जुलै २०२१ रोजी सर्वाधिक वीज वापर झाला, तो किती होता?**
- ***अ.*** २०० गिगावॅट
- ***आ.*** २००.५७ गिगावॅट
- ***इ.*** १९९.२९ गिगावॅट
- ***ई.*** २०५ गिगावॅट

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# राजकारणातील सूडसत्र

राज्यातील सत्ताधाऱ्यांच्या मते एसटीच्या संपकरी कर्मचाऱ्यांचे नेते ॲड. गुणरत्न सदावर्ते हे भारतीय जनता पक्षाचेच बगलबच्चे आहेत. न्यायालयाने सदावर्ते यांना फक्त दोन दिवसांची कोठडी वाढवून दिल्यानंतरही सदावर्तेंना दणका मिळाल्याचा आनंद सत्ताधारी व्यक्त करीत आहेत. भाजपचे मुंबईतील ज्येष्ठ नेते किरीट सोमय्या यांचा आयएनएस विक्रांत निधी संकलन प्रकरणीचा अटकपूर्व जामीन सत्र न्यायालयाने सोमवारी फेटाळला. या निकालाविरोधात उच्च न्यायालयात दाद मागण्याचा हक्क सोमय्यांना आहेच, परंतु भाजपला मिळालेल्या या दोन्ही तथाकथित न्यायालयीन दणक्यांमुळे सत्ताधारी नेत्यांना आनंदाचे भरते आले आहे.

**विभिन्न विचारसरणींचे पक्ष लोकशाहीचे अलंकार असतात. परस्परांच्या विचारसरणीचा आदर ठेवूनच आपले मतभेद ठामपणे मांडण्याबद्दल लोकशाही आग्रही असते. अशा प्रगल्भ वातावरणातच लोकशाही खऱ्या अर्थाने फळते, फुलते. स्वातंत्र्यानंतर जवळपास अर्धशतकाहून अधिक काळ असेच वातावरण भारतीयांनी पाहिले. महाराष्ट्रात तर परस्परांचा आदर राखून राजकारण करणाऱ्या नेत्यांची परंपराच आहे. तथापि गेल्या दोन-अडीच वर्षांमध्ये राज्यातील राजकारणाची पातळी इतक्या खालच्या स्तरावर गेली आहे की हाच का तो महाराष्ट्र? असा प्रश्न कुठलाही सुजाण नागरिक विचारेल. महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यानंतरच या सूडसत्राला सुरुवात झाली आहे असे म्हणता येईल. जनादेशाला केराची टोपली दाखवून सत्तेवर आलेल्या तीन पक्षांच्या कडबोळ्याला यापेक्षा दुसरे काही करताही येणार नाही हा भाग वेगळा. गेल्या अडीच वर्षांच्या रडतखडत चालवलेल्या मविआ सरकारच्या कारकीर्दीमध्ये भ्रष्टाचाराचा आणि सुडाच्या राजकारणाचा कळस गाठला गेला आहे. त्याचीच परिणती आता विखारी राजकारणात झालेली दिसून येते. मविआचे शिल्पकार आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या पेडर रोड येथील निवासस्थानावर एसटी कर्मचाऱ्यांमधील शंभर- दीडशे आंदोलकांनी हल्ला केला. त्या प्रकरणी एसटी कामगारांचे पुढारी ॲड. गुणरत्न सदावर्ते यांना न्यायालयाने आणखी दोन दिवस कोठडी वाढवून दिली. सरकारी वकिलांनी भरमसाठ आरोप करीत ॲड. सदावर्ते यांना किमान ११ दिवस पोलीस कोठडी मिळायला हवी असा युक्तिवाद केला होता. हा युक्तिवाद करताना त्यांनी पवार यांच्या निवासस्थानावरील हल्ला सुनियोजित आणि षडयंत्राचा भाग होता, असा दावा केला. सदावर्ते यांच्या वकिलांनी तिथल्या तिथे सरकारी वकिलांच्या युक्तिवादाच्या चिंध्या केल्या. ज्या घटनेमध्ये एकाही घराची काच फुटली नाही, कोणीही जखमी झाले नाही, त्याला सुनियोजित षडयंत्र कसे म्हणायचे? असा प्रतिसवाल त्यांनी केला. दोन्ही बाजू ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने सदावर्ते यांना दोन दिवसांची कोठडी वाढवून दिली. असे असूनही सदावर्ते यांना दणका मिळाल्याचा आनंद सत्ताधारी नेते व्यक्त करीत आहेत. गेली अडीच वर्षे हेच सत्ताधारी मविआचे नेते विरोधकांचे सपाटून जोडे खात आले आहेत. भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये यांचे दोन मंत्री गजाआड आहेत आणि किमान अर्धा डझन मंत्री आणि नेते रांगेत आहेत. अर्थात त्यांना रांगेत उभे करण्यामध्ये सोमय्या यांच्यासारख्या निडर नेत्याचा वाटा मोठा आहे. किंबहुना सत्ताधाऱ्यांना सळो की पळो करणाऱ्या सोमय्या यांना त्यांच्या निडरपणाचीच किंमत मोजावी लागत आहे. महाराष्ट्राची जनता हे सारे उघड्या डोळ्यांनी बघत असल्यामुळे राजकारणातील हे सूडसत्र कोणी आरंभले आहे हे स्पष्ट दिसत आहे. अशा प्रकारचे राजकारण ना महाराष्ट्राने कधी पाहिले ना अनुभवले. हे सूडसत्र थांबवण्याचा एकमेव उपाय मतदारांच्याच हाती आहे.**

# गरोदर स्त्रिया, स्तनदा माता, बालके, किशोरवयीन मुलींनो, घ्या योग्य आहार अन् राहा निरोगी..!

शासन महिला व बालकांच्या विकासासाठी सदैव तत्पर आहे. गरोदर स्त्रिया, स्तनदा माता, बालके, किशोरवयीन मुली यांनी आपल्या दैनंदिन जीवनात योग्य आहार घेऊन आपले आरोग्य निरोगी ठेवणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने कोणती काळजी घ्यावी, हे जाणून घेऊया या लेखाच्या माध्यमातून..!



**गरोदर स्त्रिया**

दररोज आयरन आणि व्हिटॅमिनयुक्त विविध पौष्टिक आहार घ्यावा. पौष्टिक असलेले दूध आणि तेल तसेच आयोडीनयुक्त मीठ खावे. आईएफएची लाल गोळी चौथ्या महिन्यापासून ते १८० दिवसांपर्यंत दररोज खावी. कॅल्शियमची ठराविक मात्रा घ्यावी. नियमित आरोग्य तपासणी करून घ्यावी. एल्बेण्डाजोलची एक गोळी दुसऱ्या तिमाहीत घ्यावी. उंच जागी झाकून ठेवलेले शुद्ध पाणीच प्यावे. डॉक्टरांच्या सल्ल्यानंतर सोनोग्राफी करावी. प्रसूतीआधी कमीत कमी ४ एएनसी तपासण्या एएनएम ताई किंवा डॉक्टरांकडून नक्की करून घ्यावी. जवळचे रुग्णालय किंवा चिकित्सा केंद्रामध्येच आपली प्रसूती करवून घ्यावी. स्वतः च्या स्वच्छतेची काळजी घ्यावी. स्वयंपाकाआधी तसेच जेवणाआधी आपले हात साबणाने नक्की स्वच्छ धुवावेत. नेहमी शौचालयाचा वापर करावा. आहारामध्ये दूध, तूप, लोणी, अंडी, मासे, हिरव्या पालेभाज्या, विविध प्रकारच्या डाळी, कडधान्ये, फळे, शेंगदाणा-गूळ लाडू, राजगीरा लाडू इ. पोषण मूल्य अधिक असणाऱ्या अन्नपदार्थांचा समावेश करावा.

**स्तनदा माता**

दररोज आयर्न आणि व्हिटॅमिनयुक्त विविध पौष्टिक आहार घ्यावा. पौष्टिक असलेले दूध आणि तेल तसेच आयोडीनयुक्त मीठ खावे. बाळंत झाल्यापासून ०६ महिन्यापर्यंत (१८०) दररोज आईएफएची एक लाल गोळी खावी. कॅल्शिअयमची ठराविक मात्रा घ्यावी. उंच जागी झाकून ठेवलेले शुद्ध पाणीच प्यावे. तान्ह्या बालकाला जन्मानंतर एक तासाच्या आतच अंगावर पाजणे सुरू करावे आणि बालकाला आपले पहिले पिवळे घट्ट दूध पाजावे. आईचे पहिले पिवळे घट्ट दूध बालकासाठी पहिल्या लसीसारखे असते. बालकाला सुरुवातीचे सहा महिने फक्त आपले दूधच पाजावे आणि वरचे काहीही पाजू नये. स्वतःच्या आणि आपल्या बालकाच्या स्वच्छतेची काळजी घ्यावी. स्वयंपाकाआधी तसेच जेवणा आधी आपले हात साबणाने नक्की स्वच्छ धुवावेत. बालकाची शी साफ केल्यावर आणि तुम्ही शौच केल्यानंतर तुमचे हात साबणाने अवश्य धुवावेत. बालकाच्या शीची विल्हेवाट लावण्यासाठी आणि तुम्ही आपल्या शौचाकरिता नेहमी शौचालयाचा वापर करावा. आहारामध्ये दूध, तूप, लोणी, अंडी, मासे, हिरव्या पालेभाज्या, विविध प्रकारच्या डाळी, कडधान्ये, फळे, शेंगदाणा-गूळ लाडू, राजगीरा लाडू इ. पोषण मूल्य अधिक असणाऱ्या अन्नपदार्थांचा समावेश करावा.

**बालके**


बालक सहा महिन्याचे झाल्यावर त्याला आईच्या दूधासोबत वरचा आहार देणे सुरू करावे. दररोज आर्यन आणि व्हिटॅमिनयुक्त विविध प्रकारचे पौष्टिक आहार द्यावा. कुस्करलेला आणि घट्ट असा वरचा पौष्टिक आहार द्यावा. पौष्टिक केलेले दूध आणि तेल तसेच आयोडीनयुक्त मीठ खावे. आईएफए आणि व्हिटॅमिन ए ची ठराविक मात्रा द्यावी. पोटातील जंतापासून बचाव करण्यासाठी १२ ते २४ महिन्याच्या बालकाला अर्धी गोळी, आणि २४ ते ५९ महिन्याच्या बालकाला एक गोळी एलबेण्डाजोलची गोळी, वर्षातून दोन वेळा आंगणवाडी केंद्राच्या मदतीने द्यावी. अंगणवाडी केंद्रावर बालकाला नियमितपणे घेऊन जावे आणि त्याचे वजन अवश्य करावे. बौध्दिक विकासाकरिता बालकाच्या वयानुसार पौष्टिक आहार अंगणवाडी केंद्राच्या कार्यकर्ती, आशा एएनएम किंवा डॉक्टरद्वारे सांगितलेल्या मात्रेत द्यावा. पाच वर्षांपर्यंतच्या सूचीमध्ये नमूद केलेल्या सर्व लसी बाळाला नियमित टोचून घ्याव्यात. स्वतःला स्वच्छतेची सवय लावून घ्यावी. उंच जागी झाकून ठेवलेले शुद्ध पाणीच प्यावे. जेवण घेण्यापूर्वी आणि जेवण भरविण्यापूर्वी अवश्य साबणाने हात स्वच्छ धुवावेत. शौच केल्यानंतर तुमचे हात साबणाने स्वच्छ अवश्य धुवावेत. वयानुसार बालकाशी खेळावे आणि गप्पा माराव्यात. बालकाच्या शीची विल्हेवाट नेहमी शौचालयात लावावी. बाळ जन्मल्यावर बाळाला तात्काळ स्तनपान सुरु करावे. सहा महिन्यांपर्यंत निव्वळ स्तनपान दयावे, स्तनपानाव्यतिरिक्त बाळास कोणतेही अन्नपदार्थ देवू नयेत. सहा महिन्यानंतर बाळाला भाताची पेज, तांदळाची पेज इ. अन्नपदार्थ सुरू करावेत, स्तनपान कोणत्याही परिस्थितीत बंद करू नये. बालक दोन वर्षाचे होईपर्यंत बाळाला स्तनपान देणे अत्यंत आवश्यक आहे. आहारामध्ये दूध, तूप, लोणी, अंडी, मासे, हिरव्या पालेभाज्या, विविध प्रकारच्या डाळी, कडधान्ये, फळे, शेंगदाणा-गूळ लाडू, राजगीरा लाडू इ. पोषण मूल्य अधिक असणाऱ्या अन्नपदार्थांचा समावेश करावा.

**किशोरवयीन मुली**

किशोरवयीन मुलींना आर्यन आणि व्हिटॅमिनयुक्त विविध पौष्टिक आहार अवश्य खाऊ घालावा. जेणेकरून मासिक पाळीच्या वेळी होणाऱ्या रक्तस्त्रावामुळे आर्यनची (लोह) झालेली कमतरता भरून निघेल आणि त्यांचा संपूर्ण विकास होईल. पौष्टिक केलेले दूध आणि तेल तसेच आयोडीनयुक्त मीठ खावे. आईएफएची एक निळी गोळी आठवड्यातून एकदा घ्यावी. स्वतःच्या स्वच्छतेची आणि मासिक पाळीच्या वेळी घ्यावयाच्या स्वच्छतेची काळजी घ्यावी. पोटातील जंतापासून बचाव करण्यासाठी वर्षातून दोन वेळा एक एल्बेण्डाजोलची गोळी घ्यावी. उंच जागी झाकून ठेवलेले शुद्ध पाणीच प्यावे. जेवणाआधी हात साबणाने धुवावेत. शौचानंतर हात साबणाने धुवावेत. नेहमी शौचालयाचा वापर करावा. आहारामध्ये दूध, तूप, लोणी, अंडी, मासे, हिरव्या पालेभाज्या, विविध प्रकारच्या डाळी, कडधान्ये, फळे, शेंगदाणा-गूळ लाडू, राजगीरा लाडू इ. पोषण मूल्य अधिक असणाऱ्या अन्नपदार्थांचा समावेश करावा.

अशा प्रकारे पोषण अभियानांतर्गत जिल्हा अभिसरण समिती रायगड यांनी सुचविल्याप्रमाणे गरोदर स्त्रिया, स्तनदा माता, बालके व किशोरवयीन मुली यांनी स्वत:च्या आहारावर विशेष लक्ष देवून आपल्या आरोग्याची नियमितपणे काळजी घ्यावी, असे आवाहन या लेखाद्वारे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी विनीत म्हात्रे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालकल्याण), जिल्हा परिषद श्री.नितीन मंडलिक यांनी केले आहे.

**-मनोज शिवाजी सानप**
जिल्हा माहिती अधिकारी
रायगड-अलिबाग



## बदलते तंत्रज्ञान



### व्हॉट्सॲप असे करा लॉक!

व्हॉट्सॲपचा वापर आजच्या काळात प्रत्येक स्मार्टफोन यूजर करत आहे. यामुळे मेसेजिंग ॲप आपल्या ग्राहकांना अधिक सुरक्षित करण्यासाठी नवनवीन फीचर्स घेऊन येत आहे. युजर्सचा वैयक्तिक डेटा सुरक्षित करण्यासाठी २ स्टेप व्हेरिफिकेशन मेसेज, डिसएपीयर फीचर्स आणि बरंच काही ऑफर करतं. याशिवाय व्हॉट्सॲपने लॉक फीचरही दिले आहे. ज्याच्या मदतीने तुम्ही तुमचे व्हॉट्सॲप लॉक करू शकता. जे तुमच्या परवानगीनंतर पुन्हा उघडता येणार नाही. दुसरीकडे जर कोणी फेस ऑथेंटीकेशन आणि फिंगरप्रिंट स्कॅनरशिवाय उघडण्याचा प्रयत्न केला तर हे फिचर त्या व्यक्तीचे नाव देखील सुचवते.



हे फिचर स्मार्टफोन युजर आणि आयफोन युजर्ससाठी उपलब्ध आहे. ते इनेबल करण्यासाठी फिंगरप्रिंट स्कॅनर आणि फेस अनलॉकिंग आवश्यक आहे. फोन लॉक केल्यानंतर, तुम्ही व्हॉट्सॲप कॉल्स प्राप्त करू शकणार नाही. आपल्या स्मार्टफोन आणि आयफोनवर Whats-pp कसे लॉक करायचे ते जाणून घेऊया.

**आयफोन युजर्ससाठी...**

सर्वप्रथम तुम्हाला तुमच्या आयफोनवर व्हॉट्सॲप उघडावे लागेल. त्यानंतर वरच्या बाजूला दिलेल्या सेटिंग्ज बटणावर टॅब करा. आता तुमच्या खात्यावर जा. त्यानंतर प्रायव्हसी या पर्यायावर क्लिक करा. खाली स्क्रोल करा आणि स्क्रीन लॉक पर्याय निवडा. आता टूगल ऑन करा, एकदा लॉक फिचर इनेबल झाल्यावर, तुम्ही फेस आयडी आणि पिन वापरून व्हॉट्सॲप अनलॉक करून वापरू शकता.


**ॲण्ड्रॉईड युजर्ससाठी...**

सर्वात आधी तुमच्या स्मार्टफोनवर व्हॉट्सॲप ओपन करा. नंतर वरच्या बाजुला असलेल्या तीन बिंदूंवर टॅब करा. आता मेनूमधील सेटिंग्जवर जा. त्यानंतर सेटिंगमध्ये अकाउंट ऑप्शनवर जा आणि प्रायव्हसी ऑप्शन निवडा. त्यानंतर तुम्ही खाली स्क्रोल करा आणि फिंगरप्रिंट लॉक करा. एकदा हे फिचर इनेबल झाल्यानंतर, तुम्ही फिंगरप्रिंट वापरून ते अनलॉक करू शकता.

# उन्हाळ्यातील धम्माल आणि बरेच काही...

उन्हाळ्याकडे आपण याच दृष्टीने बघतो की तो नकोसा वाटतो. उकाड्याने जीव हैराण होतो. खरंच आहे ते, पण यातले आपण फक्त अवगुणच पाहतो, परंतु यामध्ये बरेच गुण आहेत.

उन्हाळ्यातच मुलांना आणि आपल्याला मार्च एप्रिलपासून सुटीचे वेध लागतात. गावाला जायचे, फिरायला जायचे बेत आखायला सुरुवात होते. मे महिना म्हणजे काय मजेला उधाणच. मामाच्या गावाला याच दिवसांत जायला मिळते. शाळेला सुटी मिळून झोपेवरचे, खाण्यावरचे बंधन नाहीसे होते. मजा, मस्ती, खेळ, हुंदडण्यात ती रमून जातात. माहेरवाशीणींना माहेरची मायेची माणस भेटतात, थोरांनाही आपली मुलं, नातवंड भेटल्याचा आनंद होतो. काही जण लांब सफरीला जातात. प्रेक्षणीय स्थळे या दिवसांत आपल्याला पाहायला आलेल्या गर्दीमुळे धन्य होतात, तर अनेक आजी-आजोबा आपल्या परिवारासोबत तीर्थस्थळांना भेटी देऊन धन्य होतात.



## निमित्त

याच दिवसांमध्ये बहुतांशी जिकडे तिकडे लग्न सोहळे साजरे होत असतात. लग्न घर आनंदाचे सोहळे अनुभवत असतात. नवीन नाती जन्माला येतात. तरुण-तरुणी वैवाहिक बंधनात गुंततात आणि नवीन स्वप्नांमध्ये तरंगत असतात. प्रेमभावना आणि प्रेम अनुभवत असतात. मोगऱ्याचा सुगंध या दिवसांची आठवण अजरामर करून ठेवतो.

उन्हाळ्याच्या दिवसांत निसर्गाचा उत्सव असतो. अनेक कवी पावसांवर कविता करून त्याचे पावसाळ्याचे स्वागत करतात, पण रंगपंचमी रंग उधळत उन्हाळ्याचे स्वागत करते. आमराई बहरुन येते, फळांचा राजा आंब्याचे आगमन होते, काजू दिमाखदारपणे मिरवत असतो. फणसाचा वास घुमू लागतो. कोकमाची झाड रसरशीत भरतात, राना वनात जांभळ, करवंद, आळू, रांजण, जाम, आवळे झाडांच्या फांदी फांदी वर डोलू लागतात.

कडक उन्ह पडायला लागली की संसारिक बायकांची टिकवण्याचे पदार्थ बनविण्याची लगबग चालु होते. प्रत्येक अंगणात गच्चीवर पापड, कुरडया, फेण्या, शेव असे पदार्थ वाळताना दिसतात, मसाल्यांच्या गिरणींना या दिवसांत उसंत नसते. ताज्या ताज्या मसाल्याचा वास सगळीकडे दरवळत असतो. लहान मुल ही सुकवलेली आंबोशी, आवळे, फणसपोळी भर उन्हात पळवुन मजा लुटत असतात. लोणची, मुरांब्यांच्या भरलेल्या बरण्या स्वयंपाक घरात मिरवू लागतात.

या दिवसांत पाणी म्हणजे जीवन हा समानअर्थी शब्द अधिक तीव्रपणे पटतो. कैरीचे पन्हे, कोकम सरबत, आमरसांच्या गाड्या बाजारपेठेत तळ ठोकुन बसतात. उन्हामुळे तप्त झाल्यामुळेच पावसाच्या पहिल्या सरीने मातीला मनमोहक सुगंध पसरतो.

(साभार : मायबोली)

(छाया : लक्ष्मण ठाकूर)




### क्लिक...क्लिक...!

**पनवेल : नगरातून महानगरात रूपांतर झालेल्या पनवेलचा कायापालट होत आहे. येथील वाहतूक सुरळीत व्हावी या दृष्टीने विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. त्या अंतर्गत शहरातील भाजी मार्केटजवळील वाहतूक बेटाचा विस्तार करण्यात आला आहे.**

## आरोग्य प्रहर

### उष्णतेमुळे सतत तोंड येत असल्यास करा 'हे' उपाय

तोंड येणे ही अगदी सामान्य गोष्ट वाटत असली तरी तोंड येण्याची कारणे आणि त्यावरील उपाय समजून घेणे आवश्यक आहे. एकदा तोंड आले की काही खाता येत नाही की बोलता येत नाही. तोंडाची आग होणे, तोंडात फोड येणे, तोंडाचा आतला भाग लालसर होऊन जळल्यासारखे वाटणे अशा समस्या निर्माण होतात. अनेकदा गालाच्या आतल्या बाजूला, ओठांच्या आतल्या बाजुला आणि हिरड्यांच्या आजुबाजूला ही समस्या उद्भवते. उन्हाळ्याच्या दिवसांत तर अनेकांना उष्णतेमुळे तोंड येण्याची समस्या असते.



यावर वेळीच योग्य ते उपाय केल्यास हा त्रास कमी होऊ शकतो, मात्र अनेकांना ही समस्या वारंवार उद्भवते आणि त्याचा त्यांच्या दैनंदिन आरोग्यावर विपरित परिणाम होतो. आता तोंड येऊ नये म्हणून आणि आल्यावर काय करायचे हे समजून घेणे आवश्यक आहे. डॉक्टरकडे जाण्याआधी घरच्या घरी काही सोपे उपाय करुन पाहिल्यास त्याचा निश्चितच फायदा होतो. इतकेच नाही तर आपल्याला नेहमीच तोंड येत असेल तर नियमितपणे आरोग्याची कोणती काळजी घ्यायची याविषयी माहिती असणे आवश्यक आहे.

**तोंड येण्याची कारणे**

सतत मसालेदार आणि तिखट पदार्थ खाणे, धूम्रपान आणि अल्कोहोलचे व्यसन, दीर्घकाळ सुरु असलेले औषधोपचार, अति प्रमाणात चहा आणि कॉफीचे सेवन, पचनाच्या तक्रारी, दातांशी निगडित तक्रारी, जीवनसत्त्वांच्या अभाव.

**उपाय**

✻ पुरेशी झोप नसेल तरी तोंड येण्याची किंवा उष्णतेची समस्या उद्भवू शकते. त्यामुळे किमान सात ते आठ तासांची झोप घेणे अतिशय आवश्यक आहे.

✻ गार दूध, दही, ताक यांसारख्या पदार्थांचा आहारात आवर्जून समावेश करायला हवा. उन्हाळ्याच्या दिवसांत तर या गोष्टींचा अवश्य समावेश करायला हवा.

✻ सतत अतिमसालेदार, तिखट पदार्थ खाणे टाळावे. तसेच अतिगरम किंवा अति थंड पदार्थ खाणेही टाळावे.

✻ तुळशीची दोन ते तीन पाने चावून खावीत. तुळशीच्या रसाने तोंड येण्याची समस्या दूर होण्यास मदत होते.

✻ जीरे चावून खाल्ल्याने त्याचाही चांगला उपयोग होतो. जिऱ्याच्या रसामुळे तोंड जाण्यास मदत होते.

✻ जेवणाच्या वेळा पाळणे ही आणखी एक महत्त्वाची गोष्ट असून ज्यांना सतत तोंड येण्याचा त्रास होतो त्यांनी नियमितपणे जेवणाच्या वेळा पाळायला हव्यात.

# मोदी सरकार शेतकऱ्यांच्या विकासासाठी कटिबद्ध

## भाजप नेते अॅड. महेश मोहिते यांच्याकडून योजनांची माहिती

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान पीक विमा योजनेद्वारे शेतकऱ्यांना एक लाख सात हजार कोटींची भरपाई देण्यात आली असून किसान सन्मान निधीद्वारे देशातील सुमारे १२ कोटी शेतकऱ्यांना १.८२ लाख कोटी इतक्या रकमेचे वाटप, तर २३ कोटी मृदा आरोग्य कार्डचे वाटप करून पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारने शेतकऱ्यांच्या विकासासाठी दमदार पावले टाकली आहेत, अशी माहिती भारतीय जनता पक्षाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष अॅड. महेश मोहिते यांनी दिली.

भाजपच्या ४२व्या स्थापनादिनानिमित्त मोदी सरकारच्या लोकोपयोगी योजनांची माहिती अॅड. मोहिते यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. तांदूळ, ज्वारी, बाजरी, गहू या अन्नधान्यांच्या तसेच तेलबियांच्या किमान हमी भावात (एमएसपी) मोदी सरकारने गेल्या सहा वर्षांत भरीव वाढ केली आहे, असे त्यांनी सांगितले.



अॅड. मोहिते यांनी पुढे नमूद केले की, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी मोदी सरकारने अनेक निर्णय प्रत्यक्षात आणले आहेत. २०२२-२३च्या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रासाठी एक लाख २३ हजार ९६० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. किसान सन्मान निधी या योजनेद्वारे शेतकऱ्यांना वर्षाला सहा हजार रुपये दिले जातात. योजनेचा प्रारंभ झाल्यानंतर गेल्या तीन वर्षांत या योजनेद्वारे आतापर्यंत १० हफ्त्यांत एक लाख ८२ कोटी इतक्या रकमेचे वाटप करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना गरजेवेळी तातडीने पैसे उपलब्ध व्हावेत या हेतूने तीन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज कमीत कमी व्याजदरात किसान क्रेडिट कार्ड योजना सुरू करण्यात आली आहे. ४ मार्च २०२२पर्यंत २.९४ कोटी शेतकऱ्यांना ३.२२ लाख कोटी इतक्या रकमेचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे. या योजनेसाठी शेतकऱ्यांकडून प्रोसेसिंग फी वगैरे कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही.

नैसर्गिक आपत्ती तसेच अन्य कारणांमुळे पिकांचे होणारे नुकसान भरून देण्यासाठी २०१६मध्ये पंतप्रधान पीक विमा योजना सुरू करण्यात आली. गेल्या सहा वर्षांत या योजनेद्वारे एक लाख सात हजार कोटी इतक्या रकमेचे वाटप करण्यात आले आहे. शेतीमालाला चांगला भाव मिळावा यासाठी सुरु करण्यात आलेल्या राष्ट्रीय कृषी बाजार (ई नाम) या योजनेत १.७२ कोटी शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून १.८२ लाख कोटी रकमेच्या शेतमालाची विक्री यातून झाली आहे. शेतकऱ्यांना जमिनीचे माती परीक्षण करून देऊन त्याद्वारे जमिनीची उत्पादकता वाढविण्यासाठी मृदा आरोग्य कार्डचे वाटप केले जाते. आतापर्यंत २३ कोटी मृदा आरोग्य कार्डचे वाटप करण्यात आले आहे. मातीची तपासणी करण्यासाठी ११ हजार ५३१ प्रयोगशाळांना मंजुरी देण्यात आली आहे, असेही अॅड. मोहिते यांनी म्हटले आहे. याबाबतचे प्रसिद्धीपत्रक भाजप जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील यांनी प्रसारमाध्यमांसाठी जारी केले आहे.

# कर्जत शहरात वाहतूक कोंडी

## विकास समिती देणार प्रशासनाला स्मरणपत्र



(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**


शहरातील वाहतूक कोंडीवर उपाय शोधण्यासाठी कर्जत विकास समितीने सह्यांची मोहीम राबविली. त्यानंतर शहरातील सर्व सरकारी अधिकाऱ्यांना निवेदने दिली. त्याला प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला होता. मात्र गेल्या आठ दिवसांपासून प्रशासनाकडून संयुक्त बैठकीबाबत चालढकलपणा सुरु आहे. त्यामुळे कर्जत विकास समितीने स्मरणपत्र देण्याचा निर्णय घेतला आहे.

कर्जत शहरातील सर्व रस्त्यांवर वाहने उभी केली जात असल्याने वाहनांना आणि पादचाऱ्यांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. त्यासाठी कर्जत विकास समितीने २७ मार्च रोजी सह्यांची मोहीम राबविली. या मोहिमेत हजाराहून अधिक नागरिकांनी वाहतूक कोंडीतून शहराची सुटका करण्याची मागणी केली. या मागणीचे आणि सह्यांचे निवेदन कर्जत विकास समितीच्या वतीने ३१ मार्च रोजी कर्जत नगर परिषद मुख्याधिकारी, पोलीस ठाणे आणि तहसीलदार यांना देण्यात आले होते. त्या वेळी तहसीलदार विक्रम देशमुख यांनी ४ किंवा ५ एप्रिलला संयुक्त बैठक घेऊ असे आश्वासन दिले होते. मात्र संयुक्त बैठक झाली नाही म्हणून पुन्हा कर्जत विकास समितीचे सदस्य तहसीलदार यांच्याकडे गेले. त्यावेळी ७ एप्रिलला बैठक लावू, असे आश्वासन दिले होते. मात्र ११ एप्रिल उजाडले तरी कर्जत शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी प्रशासनाकडून बैठक लावली गेली नाही. त्यामुळे आता कर्जत विकास समितीने सर्व शासकीय अधिकाऱ्यांना स्मरणपत्र देण्याचा निर्णय घेतला आहे.

शहरातील वाहतूक कोंडीबाबत निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्यांची व कर्जत विकास संघर्ष समितीच्या सदस्यांची मिटिंग लवकरात लवकर आयोजित करावी आणि वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाययोजना करावी, असा मजकूर या स्मरणपत्रात आहे.

# पेणमध्ये यंदा ग्रामदेवतांचा जत्रोत्सव होणार हर्षोल्हासात





**पेण : प्रतिनिधी**

कार्ल्याच्या एकवीरा देवीची यात्रा ८ एप्रिल रोजी उत्साहात पार पडली असून, आता रामनवीपासून ते अक्षय्य तृतीयेपर्यंत पेणमधील ग्रामदेवतांच्या यात्रांचा माहोल रंगणार आहे. कोरोना महामारीमुळे घातलेल्या निर्बंधांमुळे दोन वर्ष यात्रा भरल्या नव्हत्या मात्र यंदा निर्बंध उठविल्याने आता यात्रा, उत्सवांना मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होणार आहे.

एकविरा देवीच्या यात्रेनंतर पेण तालुक्यातील गावोगावच्या ग्रामदेवींच्या उत्सवाची जोरदार तयारी करण्यात येत आहे. पेण तालुक्यातील विशेषतः बोरी, वाशी, गडब या ठिकाणी मोठी यात्रा भरत असते. तसेच वढाव, वाशी, पांडापूर, दादर, रावे, जिते, कळवा, वरेडी, मळेघर, उंबर्डे, कोलेटी, गडब, काळेश्री व अन्य ठिकाणी ग्रामदेवींच्या उत्सवाचा व यात्रेचा कार्यक्रम होत असतो. तालुक्यात वाशीच्या जगदंबेचा व बोरीच्या आकादेवीच्या यात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत असून खारेपाटातील हजारो भाविक या यात्रेत सामील होत असतात. यात्रेत देवकाठ्या उभारण्याच्या स्पर्धा पाहण्यासाठी व त्या उभारण्यासाठी आगळेवेगळे चैतन्य पाहायला मिळते. येथील यात्रेनिमित्त पालखी सोहोळा वाजत-गाजत मंदिरामध्ये येत असतो. सकाळपासून रात्री १० वाजेपर्यंत सुरु असणाऱ्या यात्रेत हजारो भाविक जगदंबेच्या व आकादेवीच्या दर्शनासाठी रांगा लावून दर्शन घेत असतात.

वाशीच्या जगदंबेच्या यात्रेनिमित्ताने विविध प्रकारची दुकाने, मेवा-मिठाईची दुकाने मांडण्यात येत असतात. तसेच मोठमोठी करमणुकीची साधने भाविकांसाठी उपलब्ध करण्यात येत असतात. या यात्रांसाठी ग्रामस्थांच्या वतीने योग्य नियोजन करण्यात येत असते. वढावच्या बहिरीदेवी यात्रेनिमिताने भाविक अंगावर काटेरी पेरकुट मारुन घेतात. बहिरीदेवाची पालखी गावातून निघाल्यानंतर एक वेगळाच उत्साह ग्रामस्थामध्ये निर्माण होत असतो. या ठिकाणीही मोठी यात्रा भरत असून देवकाठ्या उभारण्याच्या स्पर्धा ठेवल्या जातात.

मुंबईस्थित खारेपाटातील भाविक आवर्जून या यात्रोत्सवांना व पालखी सोहळ्याला हजर राहून यात्रेचा आनंद घेत असतात. त्याचबरोबर गडब येथील काळंबादेवीची यात्राही मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने हजारो नागरिकांच्या उपस्थितीत साजरी करण्यात येते. या ठिकाणीही देवीची पालखी सोहळा व देवकाठ्या उभारुन यात्रेचा आनंद घेतला जातो. हमरापूर, कळते, दादर, जोहे, तांबडशेत या गणेशमूर्ती कलानगरीतील तब्बल २० ते २५ हजार भाविक काळभैरव यात्रेचा मनमुराद आनंद लुटतात.

चैत्रातील त्रयोदशी व चर्तुदशीला वढावच्या बहिरीदेवीची यात्रा आहे. वाशीच्या जगदंबेच्या यात्रेला तब्बल दोन लाख भाविकांची मांदियाळी जमते. मंगळवार १६ एप्रिल रोजी हनुमान जयंती, या दिवशी पेणच्या १७१ गावापैकी १४८ गावांतील हनुमान मंदिरात रामभक्त हनुमानाचा जन्मोत्सव उत्साहाने साजरा करण्यात येतो. यामध्ये शिर्की गावात आठवडाभर हनुमान जयंती उत्सव मोठ्या भावभक्तीने साजरा होतो. किर्तन, प्रवचन, हरिपाठ, भजन, व्याख्याने व विविध गुणदर्शन कार्यक्रमाची या ठिकाणी रेलचेल असते. याच दिवशी बोरी गावची आकादेवीची यात्रा व गडब काळबादेवीची यात्रा, कळते येथे हनुमान जयंती यात्रा, असा पौर्णिमेच्या दिवशी यात्रांचा मोठा माहोल असतो. १८ एप्रिलला वरेडी गावच्या बहिरीदेवाची यात्रा, त्यानंतर ३० एप्रिलला रावे गावच्या रायबादेवीची यात्रा असते. तर अक्षयतृतीयेला जिते गावची लक्ष्मी नारायणदेवीची यात्रा असून, या यात्रेने पेण तालुक्यातील ग्रामदेवतांच्या यात्रांची सांगता होते.

# महाडमध्ये कर्मचारी आणि बसचालक यांच्यात हाणामारी

## दोघे जखमी, १० जणांविरोधात गुन्हा

**महाड : प्रतिनिधी**

तालुक्यातील औद्योगिक क्षेत्रांमधील ओलॉन कंपनीचे कर्मचारी व कंपनीचा बस चालक यांच्यामध्ये वादीवादातून रविवारी (दि. १०) झालेल्या मारहाणीत दोघे जखमी झाले असून दहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कंपनीचे कर्मचारी संदीप यादव यांनी दिलेल्या तक्रारीनुसार संदीप यादव व इतर ४० प्रवासी रविवारी दुपारी कंपनीच्या बसने प्रवास करीत असताना बस चालक अमेय खोपकर याला बस हळू चालवण्याची सूचना यादव यांनी केली. याचा राग आल्याने अमेय याने बस रस्त्याच्या कडेला उभी करून संदीप यादव, संदीप शिरसाठ व कंपनीच्या इतर कर्मचाऱ्यांबरोबर वादावादी सुरू केली. या वादाचे रूपांतर मारहाणीत झाले. त्यात चालक अमेय खोपकर व संदीप शिरसाठ हे दोघे जखमी झाले.

याप्रकरणी दोघांनीही परस्परविरोधी तक्रार दाखल केली असून महाड पोलीस ठाण्यात दहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# खोपोली श्रीराम नगरमध्ये पालखी सोहळा

**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील श्रीराम नगर येथील श्रीराम मंदिरात या वर्षीही अखंड हरिनाम सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या दोन दिवसीय समारंभात काकड आरती, प्रवचन, कीर्तन इत्यादी धार्मिक कार्यक्रम झाले. श्रीराम मंदिर ट्रस्टच्या वतीने दोन दिवस महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. श्रीराम जन्मोत्सवानिमित्त सोमवारी सायंकाळी पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. वाद्यांच्या गजरात व फटाक्यांच्या आतषबाजीमध्ये हा पालखी सोहळा ग्रामस्थ व वारकऱ्यांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे या पालखी सोहळ्यात शीख बांधवांनीही सहभाग नोंदविला होता.

# रेड्यांची झोंबी लावून लोकांची गर्दी जमविल्याने एकावर गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**


तालुक्यामधील पिंपळवाडी गावात रविवार (दि. १०)विनापरवाना रेड्यांची झोंबी लावून मोठ्या प्रमाणात जमाव जमा केल्याप्रकरणी त्याच गावातील एका इसमावर महाड औद्योगिक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाड तालुक्यातील पिंपळवाडी गावात रविवारी सकाळी ६ ते ९ वाजण्याच्या दरम्यान त्याच गावातील कृष्णा गणपत जाधव यांनी बंदी असताना विनापरवाना रेड्यांची झोंबी लावली आणि त्याकरिता मोठ्या प्रमाणात लोकांची गर्दी केली.

या प्रकरणी महाड औद्योगिक पोलीस ठाण्याचे शिपाई प्रकाश काशिराम विन्हेरकर यांच्या फिर्यादीनुसार कृष्णा जाधव याच्या विरोधात भादवी कलम १८८ प्राण्यांना क्रुरतेने वागवणे आधीनियम १९६० चे ११(ए)११एम (११) आणि जमाव बंदी कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महाडमध्ये गांजा विक्री करणाऱ्यास अटक

**महाड : प्रतिनिधी**




तालुक्यामधील आसनपोई गावात गांजा विक्री करणाऱ्या एका इसमाला स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने रविवारी (दि. १०) गांजासह अटक केली.

असनपोई गावातील एसटी स्टँडच्या मागच्या बाजूला गांजा विक्रीचा धंदा सुरू असल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला मिळाली होती. त्यानुसार रविवारी पोलिसांनी सापळा रचला. दरम्यान, त्या ठिकाणी असलेल्या रमेश सखाराम म्हस्के (रा. आसनपोई) याची स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे अधिकारी शामराव जयंसिग कराडे यांनी झडती घेतली. त्यावेळी म्हस्के याच्याकडे २०८५ ग्रॅम, २४ हजार रुपये किमतीचा विक्रीसाठी आणलेला गांजा मिळाला. सदर गांजा जप्त करून आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्यावर गुंगीकारक औषधी द्रव्य व मनोव्यापावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८(क),२०(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे


## जाहीर निवेदन

विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कोकण विभाग,नवी मुंबई यांचेकडून कळविण्यात येते की, राज्यातील नागरी सहकारी बँकांमधील पदांची नोकरभरती प्रक्रिया राबविणेसाठी या कार्यालयाकडून एजन्सीजची नामतालिका (पॅनेल) तयार करणेसाठी खालीलप्रमाणे पात्र नागरी सहकारी फेडरेशनस कडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**नामतालिकेवर समावेश होणेसाठी पात्रता निकष**

१.सदर संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अंतर्गत नोंदणीकृत असावी.
२.सदर संस्थेस किमान १० वर्षे पुर्ण झालेली असावीत.
३. किमान २५ सहकारी बँका सदर संस्थेच्या सभासद असाव्यात.
४. सदर संस्थेचा ऑडिट वर्ग मागील सलग ३ वर्ष ''अ'' असावा व सदर संस्था मागील सलग ३ वर्षात नफ्यात असावी.

नामतालिकेवर समाविष्ट होणाऱ्या एजन्सीसाठी अधिकची पात्रता व लागू अटी शर्तीसाठी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई यांचे कार्यालयाशी संपर्क करावा.

वरीलप्रमाणे नामतालिकेवर (पॅनेलवर) समावेश होणेसाठी संबंधित संस्थांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह अर्ज **मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे ४११००१** यांच नावे करावा. अर्ज सादर करणेची **अंतीम मुदत दिनांक २५ एप्रिल, २०२२** पर्यंत राहील. प्राप्त अर्जाची **छाननी दिनांक ५ मे २०२२** रोजी पुर्ण करुन अंतिम **नामिका दिनांक ११ मे,२०२२** रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

**सही/-**
**(आप्पाराव घोलकर)**
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,कोकण विभाग, नवी मुंबई

विमाका/कोवि/२०२२.२०२३/०७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, सदरहु गाळा मिळकत हि श्री. राजेंद्र ह्यांनी विकत घेण्याचे ठरवीले आहे.

**श्री . अब्दुल मोहम्मद खालीफ यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे**

**मौजे : उलवे , ता. पनवेल, जि. रायगड येथील**

| सेक्टर | लॉट नंबर | इमारतीचे नाव | गाळा नंबर |
|---|---|---|---|
| १७ | ६५ | प्रतिक अव्हेन्यु | ०४ |

मौजे उलवे येथील वर वर्णन केलेल्या गाळा श्री. अब्दुल मोहम्मद खालीफ मालक असुन ती गाळा मिळकत श्री. राजेंद्र हे विकत घेणार असुन गाळा मिळकती बाबत कोणत्याही अथवा कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत वर नमुद केलेल्या पत्त्यावर दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व श्री. राजेंद्र यांचे लाभांत खरेदीखत केले जाईल यांची नोंद घ्यावी .

दिनांक : ११.०४.२०२२
ठिकाण : पनवेल

**सही/-**
**अॅड. नित्यानंद राम ठाकूर**
मु. कोपर, पो. गव्हाण, ता. पनवेल, जि . रायगड.
फोन नंबर ९३२६०९०७०० / ८६५२८६३२०८

सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(भूखंड वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजने अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे इरादापत्र दिले असून **वाटपपत्र व करारनामा** करणे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यस्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | | | | | |
| १ | १ काळुंद्रे | युनिट केस/ निवाडा क्र. १८९(२१२) | ६५/४<br>१११/२A+२B +२C+३A | ०-४९-०<br>०-५५-० | १३०० चौ.मी. | भूखंड क्र. ७, से.-५अे<br>क्षेत्र १२९९.४३ चौ.मी.<br>नोड करंजाडे हा भूखंड वाटपाकरिता प्रस्तावित | **हरिश्चंद्र गोविंद पाटील (मयत) यांचे वारस**<br>१) रविंद्र हरिश्चंद्र पाटील<br>२) गुलाब हरिश्चंद्र पाटील<br>३) संगिता हरिश्चंद्र पाटील उर्फ संगिता राजेंद्र पाटील<br>४) कविता हरिश्चंद्र पाटील उर्फ कविता जगदिश डवले<br>५) सविता हरिश्चंद्र पाटील उर्फ सविता गणेश दळवी<br>६) निता हरिश्चंद्र पाटील उर्फ निता मंगेश पाटील<br>७) सुचिता हरिश्चंद्र पाटील उर्फ सुचिता रणजीत घरत | निरंक |
| २ | १ काळुंद्रे | युनिट केस/ निवाडा क्र. १८९(२१२) | ४६A/१ | ०-४६-० | | | | |
| | | | **एकूण** | **१-५०-३** | | | | |
| ३ | तळोजा १००४ | तळोजा ३०६ | ३०१/१ब<br>३०३/२ब<br>३०३/७ब | ०-०५-६<br>०-०९-०<br>०-१७-९ | १७५० चौ.मी. | भूखंड क्र. १०, सेक्टर १८,<br>क्षेत्र १७४४.९६ चौ.मी. | **कै. महादू सुदाम पाटील (मयत) यांचे वारस**<br>१.श्री. श्रीपत महादू पाटील<br>२.श्रीमती गुणाबाई महादू पाटील<br>३.श्री. धर्मा सुदाम पाटील<br>४.सावित्रीबाई भुराजी राजे<br>५.श्री. हरी बबल्या पाटील<br>६.कै. रामा बबल्या पाटील (मयत) यांचे वारस<br>६.१. श्रीमती पदीबाई बबल्या पाटील<br>६.२. श्रीमती रंजीता राम पाटील<br>६.३. श्रीमती करिष्मा राम पाटील उर्फ सौ. करिष्मा योगेश म्हात्रे<br>६.४. श्री. अतुल राम पाटील<br>६.५. श्रीमती श्वेता राम पाटील उर्फ सौ. श्वेता विकास भोपी<br>६.६. श्री. साजेश राम पाटील | निरंक |
| | | तळोजा २८५/७९ | २७२/२<br>२८०/६<br>२८१/४+५ | ०-६८-५<br>०-०९-९<br>०-७५-३ | | | | |
| | | तळोजा २१९ | २८१/२+३ब | ०-१३-४ | | | | |
| ४ | उलवे ५२० | न्हावे ७० | अ/६७३,<br>१अ/५४ | ०-५६-० | ५०० चौ.मी. प्रस्तावित | भूखंड क्र. १७६, सेक्टर २०,<br>क्षेत्र ५२८. चौ.मी. | **कै. काना काळूराम भोईर व कै. शांताबाई काना भोईर (मयत)**<br>१.श्री. नारायण कान्हा भोईर<br>२.श्री. चंद्रकांत कान्हा भोईर | निरंक |
| | | | **एकूण** | **०-५६-०** | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहेत. तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन वाटपपत्र करुन देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेण्यात येणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र.१०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०२७/२०२२-२३

# पनवेलचे प्रशासकीय भवन रखडले

## राज्य शासनाकडून निधी उपलब्ध होईना



### उदासीनतेमुळे इमारतीचे काम ठप्प


सर्वप्रथम प्रशासकीय भवनाच्या उभारणीसाठी नऊ कोटी ८२ लाख अपेक्षित ठरण्यात आला. यामध्ये वाढ होऊन नव्या अंदाजपत्रकानुसार हा खर्च १६ कोटींवर गेला. यामध्ये ४२४७.७० चौमी क्षेत्रफळाची इमारत, ८७९.८२ चौमी आणि दुसरा माळा अनुक्रमे १३२९.५०,१३२४.८६ चौमी आणि ११०५ चौमी क्षेत्रफळाचा तिसरा मजला असे नियोजन आहे. ८० टक्के काम पूर्ण होऊनदेखील निधीअभावी उर्वरित काम रखडले आहे. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेले हे भवन धूळखात पडले असून राज्य शासकीय पातळीवरील उदासीनता याला कारणीभूत असल्याचे दिसून येत आहे.

**पनवेल : वार्ताहर**

शासकीय कामे एकाच ठिकाणी व्हावी या उद्देशाने पनवेल शहरात उभारलेले प्रशासकीय भवनाचे काम निधीअभावी रखडले आहे. वारंवार येणारे तांत्रिक अडथळे, शासकीय पातळीवर निधी उपलब्ध होत नसल्याने कोट्यवधी रुपये खर्च करून उभारलेली इमारत धूळखात पडली आहे. ही इमारत व्हावी यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून राज्य शासनाकडे मागणी व सातत्याने पाठपुरावाही सुरू आहे.

येथील जुन्या गाळेधारकांनी प्रशासकीय भवनात पर्यायी जागा उपलब्ध व्हावी, अशी मागणी करीत न्यायालयात धाव घेतली आहे. त्यामुळे जोपर्यंत अंतिम निर्णय होत नाही, तोपर्यंत गाळे न तोडण्याचे आदेश दिले आहेत. हा एक भाग असला तरी हाती घेतलेल्या प्रशासकीय इमारतीत एकाच छताखाली शासकीय कार्यालये उभारण्याचा राज्य शासनाचा मानस कुठे तरी फोल ठरत असल्याचे स्पष्ट झाले आहे. या भवनात पनवेल तहसील, कोषागार, वनविभाग, निबंधक अणि पोलीस ठाणे ही कार्यालये होती. जुन्या इमारती जमीनदोस्त करून सर्व शासकीय कार्यालये एकाच छताखाली आणण्याचा प्रस्ताव पुढे आला. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या प्रस्तावाला प्रशासकीय मंजुरीही मिळाली. त्यानुसार तहसील कार्यालय, कोषागार कार्यालय महसूल प्रबोधनित हलविण्यात आले.

सुरुवातीला या ठिकाणी पायलिंग करण्याचे ठरले होते, मात्र या ठिकाणी बोल्डर लागल्याने पायलिंगऐवजी साडेतीन मीटर पाया खोदण्याचा निर्णय घेण्यात आला आणि तळघरातील जागा स्टील पार्किंगसाठी ठेवण्याचा निर्णय झाला. त्यातही निम्मी जागा पोलीस ठाण्याला, तर उर्वरित जागी पार्किंग करण्यावरून वाद झाला. सातत्याने प्रशासकीय भवनाचा आराखडा बदलावा लागल्याने त्यास विलंब झाला. प्रशासनकीय भवनाअभावी शहरात वेगवगेळ्या ठिकाणी विखुरलेल्या कार्यालयांत खेटे मारताना सर्वसामान्यांची तारांबळ उडत आहे. राज्य शासनाने निधी देऊन भवनास गती द्यावी, अशी मागणी होत आहे.



पनवेल : क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांची जयंती सोमवारी भाजपच्या तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात साजरी करण्यात आली. या वेळी उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी तसेच राजेंद्र पाटील, दीपक दुर्गे, मानवी पाटील, अशोक आंबेकर यांच्यासह कार्यकर्त्यांनी अभिवादन केले.



पनवेल : भाजपच्या कामोठे येथील जनसंपर्क कार्यालयात समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, भाजप ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, कामोठे ओबीसी मंडल अध्यक्ष भाऊ भगत, ज्येष्ठ कार्यकर्ते सुधाकर पाटील उपस्थित होते.

# पनवेल-उरण मार्गावरील खड्डे अखेर भरले

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण-पनवेल मार्गावरील बोकडविरा ते जेएनपीटी कामगार वसाहतीपर्यंत पडलेल्या खड्ड्यांमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. या रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी नागरिकांकडून केली जात होती. अखेर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

पावसाळ्यात बोकडविरा, महाजनको कामगार वसाहत, फुंडे स्थानक, फुंडे महाविद्यालय, जेएनपीटी कामगार वसाहत आदी ठिकाणी रस्त्यावर खड्डे पडलेले होते. त्यामुळे येथील नागरिकांना खड्डे व धुळीतून प्रवास करावा लागत होता. या रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांकडून वारंवार करण्यात येत होती. त्याची दखल घेत संबंधित विभागाने तातडीने रस्त्यातील खड्डे बुजविण्याचे काम केले आहे. त्यामुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.



# मानपाडा पोलिसांकडून अमली पदार्थांचा साठा जप्त

### एक लाख ८७ हजारांचा गांजा जप्त, तिघे अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

मानपाडा पोलीस ठाणेचे हद्दीत अवैधरित्या अमली पदार्थांची विक्री सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी धडक कारवाई करीत एक लाख ८७ हजार ३१० रुपयांचा गांजा, रोख रक्कम व विक्रीसाठी वापरणयात येणारे वाहन हस्तगत केले आहे. त्याचपमाणे तिघांना ताब्यात घेण्यात आले आहे.

मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील देसलेपाडा, डोंबिवली पूर्व येथील महाबीर अपार्टमेंटमध्ये काही जणांनी गांजा हा अमली पदार्थाचा विक्रीसाठी साठा करून ठेवल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीनुसार सपोनि. सुनिल तारमळे व त्यांचे पथक रवाना करण्यात आले होते. या पथकाने महावीर अपार्टमेंट, रूम नं. ३०२, एकतानगर, टेसलेपाडा,



डोंबिवली-पूर्व येथे छापा घातला असता, घरात मयुर मधुकर जडाकर वय २५, व अखिलेश राजन धुळप वय २६ हे दोघे असल्याने त्यांना मालासह ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून पोलिसांनी एक लाख ८७ हजार ३१० रुपयांचा ५ किलो ९०० ग्रॅम वजानाचा गांजा तसेच मोबाईल फोन, रोख रक्कम व गाडी असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

याबाबत मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दोघांकडे पोलिसांनी अधिक चौकशी केली असता, हा गांजा सुनिल उर्फ लोका दिलीप खजन उर्फ पावरा व त्याच्या साथीदारांकडून शिरपुर येथून विकत आणलेला असल्याची माहिती दिली. या माहितीचे आधारे, धुळे जिल्ह्यातील शिरपूर-लाकड्या हनुमान गाव येथून आरोपी सुनिल उर्फ लोका दिलीप खजन उर्फ पावरा वय २० यालादेखील अटक करण्यात आली आहे. शिरपूर परिसरातील लोक जंगली भागात गांजाचे उत्पादन घेत असतात, अशी माहिती त्यांनी दिली असून गांजा अटक आरोपी मयुर जडाकर व अखिलेश धुळप हे शहरातील विद्यार्थी व उच्चशिक्षितांना विकत असावेत, असा पोलिसांकडून व्यक्त करण्यात आला आहे.

# गरीब जनतेला केंद्र सरकारच्या मोफत धान्यवाटपाचा आधार

**पनवेल : वार्ताहर**

पंतप्रधान मोदींनी जाहीर केलेल्या गरीब कल्याण योजनेला मुदतवाढ देण्यात आली आहे. या योजनेत मोफत तांदूळ व गव्हाचे वाटप करण्यात येते. सदर योजनेची मुदत मार्च २०२२ मध्ये संपणार होती, परंतु त्याला केंद्र सरकारने पुन्हा एकदा मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे आता गरीब लाभार्थ्यांना सप्टेंबर २०२२ पर्यंत धान्य मिळेल. त्यामुळे महागाईच्या चटक्यांमुळे हैराण झालेल्या नागरिकांना त्याचा फायदा मिळेल.

कोरोनाचा मुकाबला करण्यासाठी शासनामार्फत पंतप्रधान गरीब कल्याण योजनेअंतर्गत गरीबांना मार्च-एप्रिल २०२० पासून मोफतचे धान्य देण्यात आले. त्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी गरीबांना मे व जून २०२१ मध्ये मोफत धान्य वाटपाची योजना

### ३० सप्टेंबरपर्यंत मिळणार धान्य



जाहीर केली होती. याच दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातील गरीबांसाठीच्या पंतप्रधान गरीब कल्याण योजनेची व्याप्ती जुलै ते नोव्हेंबर २०२१ पर्यंत वाढविली होती. केंद्र शासनामार्फत प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेंतर्गत राज्यातील प्राधान्य गट व अंत्योदय अन्न योजनेतील रेशन कार्डधारकांना मोफत धान्याचे वाटप करण्यात येणार आहे. त्यामध्ये प्राधान्य गट व अंत्योदय अन्न योजनेंतर्गत रेशन कार्डधारक कुटुंबातील प्रति व्यक्ती तीन किलो गहू व दोन किलो तांदूळ याप्रमाणे मोफत धान्याचे वाटप करण्यात येणार आहे.

सुरुवातीला ही योजना एप्रिल-जून २०२० या कालावधीसाठी सुरू करण्यात आली होती. नंतर योजनेला ३० नोव्हेंबर २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. नोव्हेंबरमध्ये या योजनेचा कालावधी संपुष्टात येणार होता. या योजनेला पुन्हा मुदतवाढ मिळणार नसल्याची चर्चा सुरू होती, मात्र गरिबांना दिलासा देणारा निर्णय केंद्र सरकारने घेतला असून, या योजनेला मार्च २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

# वृद्ध महिलेला लाखोंचा गंडा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

बँकेचे टेली व्हेरीफिकेशन करण्याच्या बहाण्याने सायबर चोरट्यांनी खारघरमध्ये राहणाऱ्या महिलेला गंडा घातल्याची घटना घडली आहे.

मोबाईलवर लिंक पाठवून त्याद्वारे महिलेच्या बँक खात्यातील सुमारे सहा लाख २९ हजार रुपयांची रक्कम या काढून घेण्यात आली आहे. खारघर पोलिसांनी या प्रकरणी अज्ञाताविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. सुरेखा वेधिकार (वय ६०) या खारघर सेक्टर-३५ मध्ये राहात असून त्यांना सेवानिवृत्तीची व ग्रॅच्युईटीची काही लाखांची रक्कम मिळाली होती. ही रक्कम त्यांनी दोन बँक खात्यात ठेवली होती. ३० मार्च रोजी सायबर चोरट्यांनी त्यांना एसबीआय बँकेचे टेली व्हेरीफिकेशन बाकी असल्याचा मेसेज पाठवून देत संपर्क साधण्यासाठी मोबाईल नंबर दिला. वेधिकार यांनी त्या नंबरवर संपर्क साधला असता, चोरट्यांनी एसबीआय बँकेचा प्रतिनिधी असल्याचे भासवून त्यांच्या व्हॉट्सपवर एक लिंक पाठवली. या लिंकवर क्लिक करताच त्यांच्या बँक खात्यातून रक्कम गायब झाली.

# दिलीप बोरस्ते यांना राष्ट्रपती पोलीस पदक

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

पुणे येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे सेवानिवृत्त अप्पर पोलीस अधीक्षक दिलीप पोपटराव बोरस्ते यांना २०१९मध्ये पोलीस सेवेतील गुणवत्तापूर्ण कामगिरीबद्दल राष्ट्रपतींचे पोलीस पदक जाहीर झाले होते. त्यांना नुकतेच राजभवनात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

दिलीप बोरस्ते यांनी महाराष्ट्र पोलीस दलात मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे, रत्नागिरी, नागपूर इत्यादी जिल्ह्यातील त्यांची उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांना २८०पेक्षा अधिक रिवॉर्डस, महाराष्ट्र पोलीस संचालक, मुंबई यांचे पदक तसेच अतिशय क्लिष्ट गुन्ह्यांचा तपास कामी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी पारितोषिके व प्रमाणपत्र देऊन गौरविलेले आहे. त्यांनी महाराष्ट्रातील गाजलेल्या बाल हत्याकांड खटल्यातील आरोपींना अटक केली. रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील जैतापूर अणुऊर्जा प्रकल्प विरोधी जनतेच्या विरोधात प्रकल्प पूर्तीकरिता उल्लेखनीय कामगिरी केली. पुणे लाचलुचपत



प्रतिबंधक विभाग येथे कार्यरत असताना अनेक लाचखोर अधिकारी-कर्मचारी यांच्या विरोधात कठोर कारवाई केली. त्यांना गौरविण्यात आल्याने त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पनवेल शहर पोलिसांना धमकावल्याने गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

'तुला चोपर आणून देतो त्यांच्या पोटात चोपर घाल,' असे बोलून पोलिसांच्या अंगावर येण्याचा प्रयत्न करून धमकी दिल्याप्रकरणी अब्दुल वजीर सय्यद (वय २७) याच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पनवेल शहर पोलिसांना कोळखे आयकॉन बार येथे अपघात झाल्याची माहिती देण्यात आली. त्या वेळी अपघातातील जखमी इसमांना पोलीस पनवेल उपजिल्हा रुग्णालयात घेऊन गेले. यावेळी आबिद वजीत सय्यद (२४, रा. वडघर) आणि आयान नूरहुसेन खान (१९ पारगाव-दापोली) यांच्यावर पोलिसांच्या मदतीने रुग्णालयात उपचार सुरू होते. त्या वेळी आबीद सय्यद यांचा भाऊ अब्दुल सय्यद हा तेथे आला व त्याने भावाला बघायचे आहे, असे पोलिसांना सांगितले. पोलिसांनी, त्याच्यावर उपचार सुरू आहेत डॉक्टर आले की, त्यांना भेटा असे सांगितले. डॉक्टरांनी प्राथमिक उपचार करुन अब्दुल सय्यद व त्याच्यासोबत असलेल्या नातेवाईक हे आबिद याला बघण्यासाठी गेले. बाहेर आल्यानंतर अब्दुल याने पोलिसांना शिवीगाळ केली व पोलीस उपनिरीक्षक अभयसिंग शिंदे यांच्याकडे पाहून आबिद यास, 'तुला चोपर आणून देतो तू ह्यांच्या पोटात घुसव,' असे बोलला आणि पोलिसांच्या अंगावर येण्याचा प्रयत्न करू लागला. त्याला पोलिसांनी समजवण्याचा व थांबवण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याने पोलिसांना धमकी दिली.

शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी अब्दुल वझीर सय्यद याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# रसायनीत संविधान चेतना रॅली

## नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

भारतीय संविधान सन्मान सुरक्षा व संवर्धन अभियानांतर्गत रसायनीमध्ये चांभार्ली ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन रसायनी येथे भारतीय संविधान चेतना रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये भारतीय संविधानाच्या सन्मानार्थ मोठ्या प्रमाणात नागरिक सहभागी झाले होते.

या रॅलीत सम्यक सामाजिक संघटना, मराठा सेवासंघ-संभाजी ब्रिगेड, भारतीय बौद्ध महासभा, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे-क्रांती संघटना युवा प्रकल्पग्रस्त सामाजिक संघटना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन समिती रसायनी, मूलनिवासी संघ रायगड जिल्हा, बामसेफ रायगड जिल्हा, या संघटना रॅलीमध्ये सहभागी झाल्या होत्या. या रॅलीला चांभार्ली येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला सम्यक सामाजिक संघटनेचे अध्यक्ष प्रकाश गायकवाड यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करून सुरुवात करण्यात आली. ही रॅली चांभार्ली ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन रसायनी अशी पायी घोषणा करीत पार पडली. संविधान रॅली पोहोचल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून संविधान जागृती सभेला सुरुवात करण्यात आली.

भारतीय बौद्ध महासभेच्या कमळ कांबळे, मूलनिवासी संघ रायगड जिल्हाध्यक्ष आशिष जाधव, महावितरण अधिकारी विकास कांबळे, सम्यक सामाजिक संघटना कोषाध्यक्ष सुनील निकाडे, मराठा सेवासंघ संभाजी ब्रिगेड रायगड जिल्हाध्यक्ष विश्वनाथ मगर, युवा प्रकल्पग्रस्त सामाजिक संघटनेचे सचिव विजय खारकर, बामसेफ महाराष्ट्रचे संघटन सचिव अरुण गोडघाटे यांनी संविधान प्रबोधन केले. सूत्रसंचालन अशोक कवडे व मिलिंद मोहिते यांनी केले.

भारतीय संविधानाची माहिती मूलनिवासी बहुजन समाजाला नसल्यामुळे त्यांच्या समस्या वाढत आहेत व त्यासाठी संविधानिक प्रशिक्षण समाजाला देण्यासाठी बीएस ४ डोअर टू डोअर हे अभियान राबविले जात आहे. संविधानिक प्रशिक्षण प्राप्त करण्यासाठी कार्यकर्त्यांना संपर्क करावा, असे आवाहन सभेचे अध्यक्ष सुजित सोनावळे यांनी केले.





# 'भिमाचे वारसदार' गाण्याचे प्रकाशन



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

प्रशिक फिल्म प्रोडक्शन निर्मित भिमाचे वारसदार या गाण्याचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

डॉ. बाबासाहेबांच्या वारसदारांना शोभेल असे गाणे हे कुंदन जाधव व त्यांचे सहकारी प्रवीण साळुंखे यांनी लिहिले, तसेच गाण्याचे संगीतसुद्धा कुंदन जाधव यांनी केले आहे. आनंदराज यांना गाणे ऐकवल्यानंतर त्यांना हे गाणे फार आवडले. त्यांनी गाण्याचे व प्रशिक फिल्म प्रोडकशनच्या सर्व टीमचे भरभरून कौतुक केले. हे गाणे हे झी युवा सिंगर फेम चेतन लोखंडे यांनी गायले असून या गाण्याला व्हिडिओच्या माध्यमातून विशाल कांबळे यांनी कोरिओग्राफ केले. संगीत संयोजन हे सुशील पेंढारी यांनी केले आहे. या वेळी प्रशिक फिल्म प्रोडक्शनचे संस्थापक कुंदन जाधव, आकाश दिलीप कांबळे, अॅड. मनीषा तायडे, सर्व टीम उपस्थित होती.

# राजस्थानची लखनऊवर मात

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये रविवारी झालेल्या दुसऱ्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने लखनऊ सुपर जायंट्सवर विजय मिळविला. राजस्थानने दिलेले १६६ धावांचे लक्ष्य गाठताना लखनऊ १६२ धावाच करू शकला. त्यामुळे राजस्थानचा तीन धावांनी विजय झाला. शिमरोन हेटमायरने केलेली धडाकेबाज फलंदाजी आणि युजवेंद्र चहलने केलेल्या दिमाखदार गोलंदाजीच्या जोरावर राजस्थानने या विजयाला गवसणी घातली.



राजस्थानने दिलेल्या १६६ धावांचे लक्ष्य गाठण्यासाठी मैदानात उतरलेल्या लखनऊ सुपर जायंट्स संघाची सुरुवात अतिशय खराब झाली. डावाच्या पहिल्याच षटकात पहिल्या आणि दुसऱ्या चेंडूवर अनुक्रमे केएल राहुल आणि कृष्णाप्पा बाद झाले. तिसऱ्या विकेटसाठी आलेल्या जेसन होल्डरनेही फक्त आठ धावा केल्या. त्यानंतर दीपक हुडा आणि सलामीला आलेला क्विंटन डी कॉकडने संघाला सावरण्याचा प्रयत्न केला. हुडाने २४ चेंडूंमध्ये २५ धावा केल्या.

आतापर्यंतच्या सामन्यांत धमाकेदार फलंदाजी करणाऱ्या आयुष बदोनीचीही जादू चालू शकली नाही. तो अवघ्या पाच धावा करू शकला. सलामीला आलेला डी कॉक ३९ धावा करून बाद झाला. त्यानंतर कृणाल पांड्याने २२, मार्कस स्टॉईनिसने ३८ आणि छमेराने १३ धावा केल्या. शेवटच्या षटकात १५ धावांची गरज असताना लखनऊ संघ १२ धावा करू शकला. त्यामुळे त्यांचा तीन धावांनी पराभव झाला.

याआधी नाणेफेक जिंकल्यानंतर लखनऊ सुपर जायंट्सने गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. राजस्थान रॉयल्स संघातर्फे जोस बटलर आणि देवदत्त पडिक्कल सलामीला उतरले. दोघेही विशेष खेळी करू शकले नाहीत. बटलर १३ आणि पडिक्कल २९ धावा करून बाद झाला. त्यानंतर कर्णधार संजू सॅमसन आणि वॅन दर डुसेन हेही लगेच बाद झाले. सॅमसनने १३ धावा केल्या, तर डुसेनला फक्त चार धावा करता आल्या. चौथ्या विकेटसाठी आलेल्या शिमरोन हेटमायरने धडाकेबाज फलंदाजी करीत लखनऊच्या गोलंदाजांना सळो की पळो करून सोडले. त्याने ३६ चेंडूंमध्ये सहा षटकार आणि एक चौकाराच्या मदतीने ५९ धावांची नाबाद अर्धशतकी खेळ केला. अश्विनने रिटायर्ड आऊटचा निर्णय घेतल्यामुळे तो २३ धावा करू शकला. त्यानंतर फलंदाजीसाठी आलेला रियान पराग आठ धावांवर बाद झाला, तर ट्रेंट बोल्टने नाबाद दोन धावा केल्या. अखेर २० षटकांचा खेळ होईपर्यंत राजस्थानने १६५ धावा केल्या होत्या.

# दिल्लीच्या विजयात कुलदीप चमकला

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये रविवारी झालेल्या पहिल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने कोलकाता नाईट रायडर्सचा ४४ धावांनी पराभव केला. दिल्लीच्या विजयात अर्धशतकवीर डेव्हिड वॉर्नर आणि पृथ्वी शॉ चमकले, तर गोलंदाजीत कुलदीप यादवने चार बळी घेत महत्त्वाची भूमिका बजावली.



दिल्लीने दिलेले २१६ धावांचे लक्ष्य गाठण्यासाठी मैदानात उतरलेल्या कोलकाता संघातील श्रेयस अय्यर वगळता एकही फलंदाज चांगला खेळ करु शकला नाही. सलामीला आलेल्या अजिंक्य रहाणेला पंचाच्या चुकीमुळे जीवदान मिळूनही तो अवघ्या आठ धावांवर झेलबाद झाला, तर व्यंकटेश अय्यरदेखील आपली जादू दाखवू शकला नाही. त्याने आठ चेंडूंमध्ये १८ धावा केल्या. अय्यरने धडाकेबाज अर्धशतकी खेळी केली. त्याने ३३ चेंडूंमध्ये पाच चौकार आणि दोन षटकार यांच्या मदतीने ५४ धावा केल्या.

नितीश राणा आणि अय्यर या जोडीने संघाला काही प्रमाणात सावरण्याचा प्रयत्न केला, मात्र संघ १०७ धावांवर असताना नितीश राणा ३० धावांवर बाद झाला आणि कोलकाता संघ उतरणीला लागला.

याआधी नाणेफेक जिंकून कोलकाताने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. दिल्लीच्या पृथ्वी शॉ आणि डेविड वॉर्नर या जोडीने चांगला खेळ करीत ९३ धावांची भागिदारी केली. वॉर्नरने ४५ चेंडूंमध्ये ६१ धावा केल्या. आपल्या खेळीमध्ये त्याने सहा चौकार आणि दोन षटकार लगावले. पृथ्वी ५१ धावांची अर्धशतकी खेळी करून बाद झाला. त्यानंतर ऋषभ पंतने मोठे फटके लगावत दोन चौकार आणि दोन षटकार यांच्या मदतीने १४ चेंडूंमध्ये २७ धावा केल्या. यानंतर ललित यादव, रोवमन पॉवेल लवकर परतले, मात्र अक्षर पटेल आणि शार्दुल ठाकूर ही जोडी प्रत्येकी २२ आणि २९ धावा करुन संघाला २१५ धावांपर्यंत घेऊन घेली.

# नागोठणे संघ मनसे माथाडी चषकाचा मानकरी

**नागोठणे : प्रतिनिधी**

मनसे माथाडी संघटना आयोजित व जय हनुमान क्रिकेट क्लब नागोठणे संयोजित मनसे माथाडी चषकाचा मानकरी साई रामनगर क्रिकेट संघ नागोठणे ठरला. द्वितीय क्रमांक जय भवानी चिंचवली, तृतीय देवळाई देवी चिकणी, तर चतुर्थ क्रमांक ओम सेवन स्टार कोळीवाडा या संघाने प्राप्त केला.

या स्पर्धेचे उद्‌घाटन मनसे दक्षिण जिल्हाध्यक्ष देवेंद्र गायकवाड, सचिव अमोल पेणकर, माथाडी कामगार सेनेचे जिल्हाध्यक्ष संजय गायकवाड, माणगाव तालुका अध्यक्ष प्रतीक राहाटे, रोजगार-स्वयंरोजगारचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद पारंगे, माथाडी सेना रोहा तालुका उपाध्यक्ष गोरखनाथ पारंगे, महिला तालुका अध्यक्ष दीपश्री घासे यांच्या हस्ते झाले.



(छाया : राज वैशंपायन)

मालिकावीर मनोज घरत, सामनावीर जीवन बेंडकुळे, उत्कृष्ट फलंदाज महेंद्र अंधेरे, उत्कृष्ट गोलंदाज निखिल देवरे, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक श्रीनंदन भिल्लारे या खेळाडूंना गौरविण्यात आले व विजयी संघांना रोख रक्कम व चषक देऊन सन्मानित करण्यात आले.

बक्षीस वितरण मनसे कामगार सेनेचे राज्य उपाध्यक्ष राजेश उज्ञेणकर, माथाडी कामगार सेना सरचिटणीस राजन शितोळे, चिटणीस येशवंत हाडगे, जिल्हा संघटक महेश पंडित, वाहतूक सेना जिल्हा उपाध्यक्ष सुबोध जाधव, पंकज डोईफोडे व गणेश खंडारे आदींच्या हस्ते झाले.

या स्पर्धेस विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती दाखवली. उपस्थित मान्यवरांचे आयोजक माथाडी कामगार सेनचे तालुका अध्यक्ष विनायक तेलंगे व विभाग अध्यक्ष नरेश भंडारी यांनी आभार मानले.

# कबड्डी स्पर्धेत श्रीगणेश दिवलांग संघ विजेता

**अलिबाग : प्रतिनिधी**

ओमकार क्रीडा मंडळ वेश्वी यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत श्रीगणेश दिवलांग संघाने विजेतेपद पटकाविले. पांडवादेवी रायवाडी संघ उपविजेता ठरला. उपांत्य उपविजयी ठरलेले टीएमबी करावी व भैरवनाथ पेझारी संघांना तृतीय क्रमांकाचे बक्षीस देण्यात आले.

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने रविवारी (दि १०) अलिबाग तालुक्यातील वेश्वी येथे जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात




आली होती. या स्पर्धेत जिल्ह्यातील निमंत्रित १६ तुल्यबळ संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते.

दिवलांग संघाचा खेळाडू अक्षय पाटील याला स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरविण्यात आले. रायवाडी संघाच्या केदार लाल याला उत्कृष्ठ चढाई, तसेच पेझारी संघाच्या चेतन म्हात्रे यास उत्कृष्ट पकडीचे बक्षीस देण्यात आले. आदर्श खेळाडू म्हणून जय बजरंग बेली संघातील स्वप्नील वेळे आणि पब्लिक हिरो म्हणून करावी संघाच्या संदेश पाटील याला गौरविण्यात आले.

ओमकार क्रीडा मंडळाचे अध्यक्ष प्रफुल्ल पाटील, राज्य पातळीवरील शरीरसौष्ठवपटू संजय उले, गिरीश शेळके, राकेश राऊळ, अमोल नलावडे, अ‍ॅड. प्रशांत राऊळ, निलेश नलावडे, प्रसाद मगर, गजानन मगर, विरेंद्र मगर, आणि पदाधिकारी व सदस्यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

# सुधागडचा शरीरसौष्ठवपटू दामोदर हुलेला राज्यस्तरीय स्पर्धेत सुवर्णपदक



**पाली : प्रतिनिधी**

पनवेल येथे झालेल्या ५९व्या राज्य अजिंक्यपद महाराष्ट्र श्री २०२२ स्पर्धेत सुधागड तालुक्यातील दामोदर हुले याने दमदार कामगिरी करीत सुवर्णपद पटकाविले.

महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशन, बॉडी बिल्डर्स अ‍ॅण्ड फिटनेस असोसिएशन रायगड, इंडियन बॉडी बिल्डर्स अ‍ॅण्ड फिटनेस फेडरेशन आणि भारतीय जनता पक्ष विचुंबे यांच्या वतीने राज्य अजिंक्यपद शरीरसौष्ठव व फिटनेस स्पर्धेचे आयोजन पनवेलजवळील विचुंबे येथे आयोजित करण्यात आले होते.

या स्पर्धेत सुधागड तालुक्यातील पोटलज खुर्दमधील दामोदर हुले याने ५५ किलो गटात सहभाग घेतला होता. यात दामोदरने सुवर्णपदक जिंकले. जिम ट्रेनर सचिन भुरटे आणि अभिषेक कदम यांनी या स्पर्धेसाठी दामोदरला उत्तमरीत्या तयार केले होते.

# एम्बापे, नेयमारमुळे सेंट-जर्मेन विजयी

**पॅरिस :** किलियन एम्बापे आणि नेयमार यांच्या हॅट्ट्रिकच्या जोरावर पॅरिस सेंट-जर्मेन संघाने लीग-१ फुटबॉलच्या सामन्यात क्लेर्मोन्टचा ६-१ असा धुव्वा उडवला.

या सामन्यात नेयमारने सहाव्या, तर एम्बापेने १९व्या मिनिटाला गोल करीत सेंट-जर्मेनला २-० अशी आघाडी मिळवून दिली. क्लेर्मोन्टच्या जोडेल दोसूने ४२व्या मिनिटाला गोल केला. उत्तरार्धात सेंट-जर्मेनने अधिक आक्रमक खेळ केला. नेयमारने ७१व्या मिनिटाला पेनल्टीच्या साहाय्याने गोल झळकावताना संघाला पुन्हा दोन गोलची आघाडी मिळवून दिली. मग एम्बापेने ७४ व ८०व्या, तर नेयमारने ८३व्या गोलची नोंद करताना वैयक्तिक हॅट्ट्रिक पूर्ण केल्या.

# कनिष्ठ विश्वचषक हॉकी स्पर्धेत भारताचा उपांत्य फेरीत पराभव

## कांस्यपदकासाठी आज होणार लढत

**पोचेफस्ट्रोम : वृत्तसंस्था**

भारतीय महिला हॉकी संघाला ‘एफआयएच’ कनिष्ठ विश्वचषक हॉकी स्पर्धेतील उपांत्य फेरीच्या सामन्यात रविवारी तीन वेळच्या विजेत्या नेदरलँड्सकडून ०-३ असा पराभव पत्करावा लागला. त्यामुळे भारताचे पहिल्यांदा या स्पर्धेची अंतिम फेरी गाठण्याचे स्वप्न अधुरेच राहिले. आता मंगळवारी (दि. १२) भारतीय संघ कांस्यपदकाच्या लढतीत खेळेल.

भारतीय महिला संघाने २०१३च्या पर्वात कांस्यपदक जिंकले होते. ही भारताची कनिष्ठ विश्वचषकातील सर्वोत्तम कामगिरी होती. यंदा एक पाऊल पुढे जाऊन अंतिम फेरी गाठण्याचा भारताचा मानस होता, मात्र त्यांना यात यश मिळाले नाही.

उपांत्य फेरीच्या सामन्यात भारताला सर्वोत्तम खेळ करण्यात अपयश आले. नेदरलँड्सने आक्रमण आणि बचाव या दोन्हींत अप्रतिम खेळ करताना सलग चौथ्यांदा स्पर्धेची अंतिम फेरी गाठली आहे. त्यांच्याकडून या सामन्यात तेसा बीट्समा (१२ वे मिनिट), लुना फोक्के (५३ वे मि.) आणि जीप डिके (५४ वे मि.) यांनी गोल झळकावले.



भारताने या सामन्याला चांगली सुरुवात केली. भारताकडून स्पर्धेत सर्वाधिक सहा गोल करणाऱ्या मुमताज खानने संघाला आघाडी मिळवून देण्याचा प्रयत्न केला, मात्र कर्णधार समिमा टेटेच्या पासवर तिने मारलेला फटका गोलपोस्टला लागला. पहिल्या सत्रात भारताला तीन पेनल्टी कॉर्नर मिळाले, पण त्याचे गोलमध्ये रूपांतर करण्यात त्यांना अपयश आले. त्यानंतर नेदरलँड्सने दमदार पुनरागमन केले. बीट्समाने १२व्या मिनिटाला गोल करीत नेदरलँड्सला १-० अशी आघाडी मिळवून दिली.

भारताकडून दुसऱ्या सत्रातही गोल करण्याचे प्रयत्न झाले, मात्र त्यांना नेदरलँड्सचा भक्कम बचाव भेदता आला नाही. उत्तरार्धात नेदरलँड्सने आक्रमणाची गती वाढवली. त्याचा फायदा संघाला चौथ्या सत्रात मिळाला. लुना फोक्के आणि जीप डिके यांनी दोन मिनिटांत दोन गोल झळकावताना नेदरलँड्सची आघाडी ३-० अशी भक्कम केली. यानंतर भारतीय संघाला पुनरागमन करणे वेळेअभावी शक्य झाले नाही.

# जडेजा नव्हे; तर प्लेसिस हवा होता चेन्नईचा कर्णधार -शास्त्री

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्ज संघाची दुर्दशा झालेली असताना भारतीय क्रिकेट संघाचे माजी मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी चेन्नईची कामगिरी आणि कर्णधारपदावर मोठे भाष्य केले आहे. त्यांनी रवींद्र जडेजाच्या जागेवर दुसरा खेळाडू कर्णधार असायला हवा होता, असे म्हटले.

आयपीएलच्या पंधराव्या हंगामाला सुरुवात होऊ दोन आठवडे झाले आहेत. या हंगामातील सर्वच सामने रोमहर्षक होत असून वेगवेगळ्या संघाची विजयी घोडदौड सुरु आहे. असे असले तरी दुसरीकडे मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज या दोन संघांनी आतापर्यंतचे सर्वच सामने गमावले आहेत. एकाही सामन्यात विजय प्राप्त करता न आल्यामुळे चेन्नई संघ गुणतालिकेत सर्वांत शेवटच्या स्थानावर आहे.

सनरायझर्स हैदराबाद आणि चेन्नई या दोन संघांमध्ये शनिवारी सामना झाला, मात्र या सामन्यात चेन्नईला पराभवाचा सामना करावा लागला. या हंगामातील चेन्नईचा हा चौथा पराभव आहे. रवी शास्त्री यांनी संघाच्या खराब कामगिरीवर भाष्य केले. चेन्नईचा कर्णधार रवींद्र जडेजा नव्हे; तर फाफ डू प्लेसिस असायला हवा होता, असे शास्त्री ईएसपीए क्रिकइन्फोशी बोलताना म्हणाले तसेच जडेजाने आपल्या खेळाकडे लक्ष केंद्रित करणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

चेन्नईने फाफ डू प्लेसिसला जाऊ द्यायला नको होते. प्लेसिस हा सामन्याला कलाटणी देणार फलंदाज आहे. धोनीला कर्णधारपद नको होते, तर त्याऐवजी प्लेसिसकडे ही जबाबदारी सोपवायला हवी होती. रवींद्र जडेजाने एक खेळाडू म्हणून सामन्यात सहभागी व्हायला हवे होते. कर्णधारपद नसल्यामुळे तो मुक्तपणे खेळू शकला असता. कर्णधार नसल्यामुळे जडेजावर दबाव नसता, असे शास्त्री म्हणाले.

दरम्यान, या हंगामाच्या सुरुवातीलाच महेंद्रसिंह धोनीने कर्णधारपदाचा त्याग करीत चेन्नई सुपर किंग्जची जबाबदारी रवींद्र जडेजाकडे सोपवली. या हंगामात चेन्नई संघ आतापर्यंत एकही सामना जिंकू शकलेला नाही. चेन्नईने आतापर्यंत सलग चार सामने गमावले आहेत.

# यंदाच्या आयपीएलमध्ये पंचांकडून चुकांवर चुका

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलच्या यंदाच्या हंगामात सुरुवातीपासून पंचांच्या खराब कामगिरीची चर्चा होत आहे. शनिवारी झालेल्या रॉयल्स चॅलेंजर्स बंगळुरू आणि मुंबई इंडियन्सच्या सामन्यात विराट कोहलीला चुकीच्या पद्धतीने बाद केल्यामुळे पंचांच्या कामावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. यानंतर रविवारी कोलकाता नाईट रायडर्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यातील सामन्यातही पंचांनी तीन वेळा चुकीचा निर्णय दिला.

दिल्ली कॅपिटल्सने कोलकातासमोर २१६ धावांचे आव्हान उभे केले होते. हे आव्हान गाठण्यासाठी कोलकाताचे अजिंक्य रहाणे आणि व्यंकटेश अय्यर सलामीला आले होते, मात्र पहिल्या तीन चेंडूंमध्ये पंचांनी तीन वेळा चुकीचा निर्णय दिला. पंचांनी पहिल्या दोन चेंडूंत अजिंक्यला बाद ठरवले, पण डीआरएस घेतल्यामुळे तो दोन वेळा नाबाद राहिला, तर तिसऱ्या चेंडूमध्ये चेंडू बॅटची किनार पकडून यष्टीरक्षकाच्या हातात विसावूनही पंचांनी अजिंक्यला बाद म्हणून घोषित केले नाही.

पंचांच्या चुकीच्या निर्णयामुळे आयपीएलमध्ये यापूर्वी अनेक संघांना फटका बसला आहे. सलग दुसऱ्या दिवशी पंचांचा तीन वेळा निर्णय चुकल्याने नाराजी व्यक्त होत आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com